श्री गुलाबरावमहाराजांची अभंग गाथा

यष्टी ९ पूर्वार्ध

३,१५८ अभंगांपैकी १८४ ते २९८ अभंग

# अभंग चिंतन

# २

# उपासना



**अनुवाद**

**डॉ. कृ मा. घटाटे**



## ६. उपासना

### अभंग १८४

कात्यायनी अर्चना

पेरिले ते फळे नाही अनारिसे । होतसे आपैसे जयापरी ।।१।।

तैसे जे जे केले होय प्राप्त । बोलियले आप्त वसिष्ठादि ।।२।।

तयांसी द्यावया मानाची ती गुढी । अर्चितसो फुडी कात्यायनी ।।३।।

सर्वांही येवोनी करावी या पूर्ती । ज्ञानेश्वरचित्ती समावेश ।।४।।

चिंतन :-

जे पेरल्या जाते त्याचेच फळ होते त्याहून वेगळे काही होत नाही.

आणि ते आपोआप होते. प्रयत्न करावे लागत नाही.

त्याप्रमाणे जे जे कर्म करू ते फलरूपाने पुनः मिळते, असे वसिष्ठादी खऱ्या आप्तांनी सांगितले आहे.

त्या कर्मसिद्धांताच्या सन्मानासठी कात्यायनीची अर्चना करीत असतो.

सर्वांनी कात्यायनीची पूजा करून माझी इच्छा पूर्ण करावी.

म्हणजे ज्ञानेश्वर हृदयात स्थानापन्न होतील.

१८५

ब्राह्ममुहूर्तीं उठोनि ।

स्नात बैसावे आसनी ।।१।।

करुनी स्ववर्णसंध्या । आठवावे जगद्वंद्या ।।२।।

भावे कीजे प्राणायाम । चित्ती ध्यावा मेघःश्याम ।।३।।

बारा अक्षराचा मंत्र । सदा स्मरावा पवित्र ।।४।।

ऐसे करी ध्रुव बाळा । दया येते घननीळा ।।५।।

ऐसे सांगोनि नारद । गेले वैकुंठासी सिद्ध ।।६।।

तोचि धरूनियां क्रम । जनी करावा संभ्रम ।।७।।

ज्ञानेश्वरप्रभुकृपा । तरी मार्ग मिळे सोपा ।।८।।

ा जागे व्हावे.

ासनावर बसावे.

ाणे संध्या करावी.

शा परमेश्वराचे चिंतन करावे.

यात सफल होणारच असा दृढ भाव धरून प्राणायाम करावा.
चित्तात मेघःशामाचे ध्यान करावे.
बाराक्षरी मंत्र नेहमी सातत्याने जपत राहावा.
असा उपदेश करून श्रीनारद पुढे वैकुंठास निघून गेले.
ध्रुवबाळाने असेच केले.
अशा करण्यानेच घननीळाला दया येते.
सर्व परमार्थियांनी असाच क्रम चालू करून आपल्यात उत्साह आणावा.
आणि परमार्थ साधावा.
पण असा सोपा मार्ग मिळण्यासाठी ज्ञानदेवांचीच कृपा हवी.
हे कृपेच्या सागरा, आळंदीवरा, आम्हावर कृपेचा वर्षाव करावा. हेच मागणे !

१८६

आधपद - द्यावयाची वाटे लाज । तरी सांडा देवपण काज ।
जननीचा म्हणा मज । तृप्तकाज सकळही ।।१।।
सांडा मोठेपणा तळ । मम गृही व्हावे बाळ ।
चित्ती चरणकमळ । ठाकुनिया सर्वदा ।।२।।
अत्ता चराचरग्रहणादिति । ब्रह्मसूत्राची हे उक्ति ।
समयीच मजप्रती । पोटी ठेवा भक्षोनि ।।३।।
मग तुम्ही आम्ही दोघे । नित्य राहूं संतसंगें ।
गुरूसेवा करूनी अंगें । ज्ञानेश्वरा तोषवूं ।।४।।

चिंतन :-
तुम्हाला मला काही देण्याची लाज वाटत असेल तर -
देवपण आणि देवकार्य सोडून द्या.
आपला मोठेपणा सोडून द्या,
मला आई म्हणा.
माझे घरी माझे बाळ व्हा
-म्हणजे मला सर्वकाही मिळाले.
माझ्या चित्तात आपले पाय नेहमीसाठी ठेवून तेथेच राहा.
सर्व विश्वाला तुम्ही ग्रहण करणारे असल्यामुळे तुम्ही सर्व भक्षक आहात.
हे ब्रह्मसूत्रात स्पष्ट वचन आहे.
म्हणून यावेळी माझे भक्षण करा.

तुम्ही मला आपल्या पोटात स्थान द्या.
मग तुम्ही आणि मी नेहमीसाठी संतसंगात जाऊन राहू.
मुख्य म्हणजे आपण दोघे मिळून श्रीगुरू ज्ञानेश्वरांची सेवा करू.
त्यांना संतोष देऊ.

१८७

नित्य ऐसा अनुभव । आधी व्हावा ब्रह्मभाव ।
तरी कळे हरीचे नांव । तत्त्वठाव हा एक ।।१।।
योगसिद्धि पाया पडे । मोक्ष पाणी भरी पुढे ।
ब्रह्मज्ञान ते रोकडे । सेवकपणे नांदत ।।२।।
वेदविद्या होय दासी । शास्त्रविद्या राहती वेशी ।
कला वारांगना त्यांसी । प्रवेश नव्हे आंत ।।३।।
आत्मविद्या शहाणपणा । परि ती खेळते आंगणा।
ब्रह्मविद्या द्वारी जाणा । रक्षणासी राहिली ।।४।।
महावाक्य वारा घाली । आनंद तो करी खोळी ।
शांति पाळणा निजली । मजपुढे येवोनी ।।५।।
सखी माझी भगवद्भक्ती । मोकळीक तिजप्रती ।
उचलोनी कडिये प्रती । सर्वदां मजला घेते ।।६।।
तेहि विरोनिया थिते । भक्तीच्या पाया पडे नित्य (ते)।
झाली एकाएकी स्तब्ध ते । आरूते परते नोहे ।।७।।
भक्ति माय माउली । सदा कृपेची साउली ।
ज्ञानेश्वराचे पाउली । भक्ति राहो अखंडित ।।८।।

चिंतन :-
सर्वांचा नेहमीचा अनुभव आहे की आधी ब्रह्मभाव अंगी बाणल्याखेरीज,
हरिनामाचा वास्तविक अर्थ कळत नाही.
तत्वतः साधकाचे आरंभीचे नाम घेणे म्हणजे केवळ वाचेची बडबड असते.
नामरूपा नही मेळ । नुसता वाचेचा गोंधळ । श्रीतुकोबा.
नाम झाल्याविण । नोहे नामफळ । द्वैत ते केवळ दुःख दावी ।। महाराज स्वयं.
नाम हे साक्षात परब्रह्म आहे, असा अनुभव आल्यानंतर नामाची महती लक्षात येते.
आणि मग योगसिद्धी पायी लोळू लागतात.
मोक्ष घरी पाणी भरतो.

ब्रह्मज्ञान सेवकासारखी सेवा करते.
वेदविद्या दासी होते,
शास्त्रविद्या भोवताल संरक्षणासाठी वेशीवर राहते.
कला वगैरे वारांगना असल्याने त्यांना आत प्रवेश नाही.
आत्मविद्या म्हणजे खरा शहाणपणा होय, पण ती आंगणात खेळते.
ब्रह्मविद्या द्वारावरती रक्षण करते.
महावाक्ये (तत्वमस्यादि) वारा घालतात.
आनंद हातात असलेल्या मोठ्या (पोत्यात) खोळीत भरून राहतो.
शांती माझेपुढे येऊन पाळण्यात झोपते.
माझी मैत्रिण भक्ती आहे.
ती देव आणि भक्त, अशी द्वैत-इव आहे.
तिला सर्वीकडे येण्याजाण्यास पूर्ण मुभा आहे.
ती मला नेहमी कडेवर उचलून घेते.
पण तीही स्वत:च विरून जाते आणि ती अद्वय-भक्तीच्या नेहमी पाया पडत राहते.
तीही एकाएकी स्तब्ध होऊन गेली आणि इकडे, तिकडे, चोहीकडे दिसणारी संकल्पना म्हणजे देशभाव नाहीसा झाला.
असे अनुभवाचे पय:पान करविणारी भक्ती हीच माय माउली आहे.
तिची कृपेची सावली नेहमी मजवर असते.
ही माझी अंत:करणातील भक्ती ज्ञानदेवांचे पाउलांवर अखंड राहो, हीच प्रार्थना!

१८८

सकळ जन्मांचे पावले निधान । पाहिले चरण तुझे देवा ।।१।।
सोडियले साऱ्या संसारासी पाणी । लागले चरणी आता तुझ्या ।।२।।
आता मजवरी करोनिया कृपा । विझवीजे तापा संसाराच्या ।।३।।
ज्ञानेश्वरप्रभु कृपेचा सागर । करील निर्धार पूर्ण इच्छा ।।४।।

चिंतन :-
सर्व जन्मात मिळविण्याचे निधान म्हणजे तुझे चरण होत.
ते मी आज पाहिले.
आता सर्व संसारावर मी पाणी सोडले.
तुझ्या चरणाच्या सेवेत मी लागलो.
आता तरी माझेवर कृपा कर.

संसाराचा ताप शांत कर.
ज्ञानेश्वरप्रभु कृपेचे सागर आहेत. ते निश्चिंतपणे माझी इच्छा पूर्ण करतील.

१८९

ध्यानी मनी नारायण । नाही ऊन सुखासी ।।१।।
बाळा जिवंत माउली । कृपा साउली अढळ ।।२।।
अनन्य चिंतनबळे । योगक्षेम मेळे येती ।।३।।
ज्ञानेश्वर दीनानाथ । अखंडीत दे साह्य ।।४।।

चिंतन :-
ध्यानी मनी नारायण जर असला तर सुखाला कमतरता नसते.
लहान बाळासाठी प्रत्यक्ष आई असली की कृपेची छाया अखंड असते.
दुसरे कोठलेहि चिंतन न करता केवळ नामचिंतनामुळे परमेश्वराची प्राप्ति आणि परमार्थ स्थितीचे संरक्षण दोन्ही होते.
अनन्य दीन असलेल्या अनाथांचे श्रीज्ञानेश्वर नाथ आहेत ते अखंड साह्य देत असतात.

१९०

तयाची गाईन चहूंवाणी कीर्ति । कृष्णपायी रति दृढ ज्याला ।।१।।
तयाते जाईन भावे लोटांगणी । ज्याच्या हृदयांगणी कृष्ण उभा ।।२।।
तयाच्या करीन गृही संमार्जन । करी जो मार्जन कृष्णतीर्थे ।।३।।
सावडीन त्याचे विष्ठा आणि मूत्र । जया नंदपुत्र आवडता ।।४।।
अन्य हो का सिद्ध तयातें न मानी । एका चक्रपाणी वांचोनिया ।।५।।
जन्मजन्म त्याची करीनचि सेवा । जो श्रीज्ञानदेवा प्रिय झाला ।।६।।

चिंतन :-
श्रीकृष्णाचे चरणांवर ज्याचे दृढ प्रेम आहे त्याची कीर्ती मी चारी वाणींवर गात राहीन.
ज्याच्या हृदयाकाशात कृष्ण विराजमान आहे त्याचे पायी भक्तिभावाने लोटांगण घालीन.
जो कृष्णतीर्थ स्वतःच्या मस्तकावर मार्जन करतो, त्याची विष्ठा आणि मूत्र देखील मी सावडून काढीन.
एका श्रीकृष्णाशिवाय कोणत्याहि मोठमोठ्या सिद्धांना सुद्धा मी मोठे मानीत नाही.
जो ज्ञानदेवांना प्रिय झाला त्याची सेवा मी जन्मोजन्मी करीन.

१९१

आमुचा जो काम तेणे पति हरी । इंद्रियांचे वरी क्रोध थोर ।।१।।
गुरूतीर्थालागी अत्यंत आवडी । हरिदास्य गोडी अभिमान ।।२।।

संतसेवेसाठी वागवू शरीर । प्रेमाचे बिढार हृदय हे ।।३।।
ऐसा हा आमुचा मुख्य संप्रदाय । ज्ञानेश्वरपाय ध्यानी मनी ।।४।।

चिंतन :-

आमच्या कामविकाराने हरी हा पति म्हणून मिळाला.
इंद्रियांवर क्रोधाचा भडिमार करून त्यांना ताब्यात ठेवले आहे.
श्रीगुरुंच्या चरणतीर्थाची आम्हाला अत्यंत आवडी आहे.
हरिची सेवा करण्याचा अभिमान आहे.
हे शरीर संतांचे सेवेसाठी झिजवत असतो.
हरीप्रेमाचा साठा करण्याचे स्थान माझे हृदय आहे.
असा हा आमचा मुख्य संप्रदाय आहे.
ज्ञानेश्वरांचे चरण नेहमी ध्यानी मनी असतात.

१९२

योगाचे ते बळ नाही आम्हांपाशी । जरी का कोणासी पाहिजेल ।।१।।
विनवाया नाही नम्र माझी वाणी । जेणे सुख मनी श्रोतियांच्या ।।२।।
नाही माझी बुद्धि अती तीव्रतर । कर्षील अंतर संशयाचे ।।३।।
नाहीच इंद्रियरोध एकचित्त । धर्मासी उचित कर्म नाही ।।४।।
कोणावरी नाही माझा उपकार । नाहीं माझा भार हरिवरी ।।५।।
ज्ञानेश्वर बापमाय जन्मदाता । तोचि आम्हां त्राता सर्वकाळ ।।६।।

चिंतन :-

जर कोणाला योगबळाची इच्छा असेल तर योग शिकविण्याची शक्ती माझेपाशी नाही.
ज्यामुळे श्रोत्यांना आनंद होईल अशी नम्रवाणी मजजवळ नाही.
सर्वांचे संशय निवारण करील अशी तीव्र बुद्धी माझेजवळ नाही.
इंद्रियांना मी आवरू शकत नाही किंवा धर्माप्रमाणे माझे आचरण नाही.
कोणावरही मी उपकार केला नाही.
माझे काम भगवान करतात असेही नाही.
ज्ञानेश्वर हेच मातापिता आणि जन्म देणारे आहेत.
आणि तेच आमचा सर्वकाळ सांभाळ करतात.

१९३

(आधपद) केशव नारायण माधव गोविंद । वंदू प्रेमे पदारविंद ।।१।।
टाकुनिया ही सकळ कल्पना । स्वर्गादिक फळ इच्छू अल्प ना ।।२।।
गणपति ब्रह्मकुमारी श्रीगुरू । अवघा श्रीज्ञानेश्वरचि करुं ।।३।।

चिंतन :-

केशव, नारायण, माधव, गोविंद असे नामस्मरण करीत प्रेमाने त्याचे चरण कमलांना वंदन करू.

संसारासंबंधी सर्व कल्पना सोडून देऊ.

स्वर्गादि फळांची अल्प देखील इच्छा ठेवणार नाही.

गणपती, सरस्वती, श्रीगुरु हे सर्व काही एक ज्ञानेश्वर माऊलीच आहे याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे.

१९४

पाय कोमल नारायणा । कठिण तर्क पलंग-पाळणा ।
जेणे होय रसवितळणा । यास्तव चरणी घालाव्या वाहाणा ।।१।।
हरीसाठी येतां अश्रुधारा । म्हणे यांच्या आंगी भरला वारा ।
प्रेमासाठी रडणे एका बारा । वेड हे कां नये चमत्कारा ।।२।।
तर्क तरी व्हावा इष्ट भाव । जेणे तुटे विषयांची हाव ।
त्वरे भेटे येउनी वासुदेव । संतसंगे सांपडे ब्रह्मठेव ।।३।।
नाकाहूनी सुंदर जड मोती । औषधी हरी शरीरसंपत्ति ।
ऐसी कासया तर्के न्यावी मती । जेणें आपणासी अनिष्टत्वप्राप्ति ।।४।।
नैषा मतिस्तर्केणापनेया । ऐसी सांगे प्रणवपितृजाया ।
हेचि चित्ती धरुनी यादवराया । आम्ही दंडवत करितो पायां ।।५।।
यश गाऊ श्रीहरीचे वाचे । तेणे रंजवू चित्त साधूंचे।
नाही मान काही कवित्वाचे । फिटे पारणे सहज जीवाचे ।।६।।
पुरे आता तुम्हास जाणविणे । यासाठी तो श्रीहरि विनविणे ।
कळेना हे गुरू सुजाणवीणे । ज्ञानेश्वरचरणी शरण जाणे ।।७।।

चिंतन :-

हे भगवंता तुझे पाय अती कोमल आहेत.

तर्करूपी पलंग किंवा पाळणा फार कठीण आहे.

तेथे जर तुला निजविले तर तुला त्रास होईल.

सर्व भक्तिरस वितळून शुष्कता येईल.

प्रेम नाहीसे होईल.

म्हणून आमच्या हृदयात उमटलेले तर्करूपी टोचणारे काटे आपणाला टोचू नयेत.

यासाठी तुम्ही आपल्या पायात वाहणा घालाव्या.

हरीसाठी जर प्रेमाश्रू आले तर -
नास्तिक म्हणतात - यांच्या अंगी वात शिरला आहे. वातातील बडबड आहे.
पण लौकिक प्रेमासाठी मात्र एकच काय, सारेच लोक रडतात.
पण ते वेड असूनहि त्यांना त्या रडण्याचे आश्चर्य वाटत नाही.
तसे पाहिले असता...
तर्काचा उपयोग लौकिकात अवश्य करावा.
त्या कठोर तर्काने- जे हिताचं आहे, इष्ट आहे त्याची प्राप्ति झाली पाहिजे
आणि विषयांची हांव सुटली पाहिजे.
म्हणजे मग संतांच्या सहवासाने ब्रह्माचा ठेवा सांपडतो आणि ताबडतोब भगवान् वासुदेव येऊन भेटतो.
सुंदर मोती आहे अन् तो नाकापेक्षा जड झाला तर काय उपयोग?
औषधी घेतली पण शरीरच बिघडले तर काय फायदा?
असे करणाऱ्याने तर्काच्या स्वाधीन बुद्धी कशाला द्यावी?
की ज्याने आपलेच अनिष्ट होईल?
आपली मति तर्काने विपरीताकडे नेऊ नये.
असे ॐकाराचा पिता ब्रह्मदेव त्याची पत्नी सरस्वती ही हेच सांगते.
आम्ही हे सारे लक्षात ठेवून श्रीकृष्णाच्या पाया पडतो.
श्रीहरीचे यशोगान करून साधूंच्या मनाला समाधान देऊ.
कवित्व केल्याचा आम्हाला मान नको आहे.
पण त्या कवित्वाने जीवनाचं पारणं फिटून जातं.
तुम्हाला हे सांगणे आता पुरे झाले.
आता श्रीहरीला विनविणेच शिल्लक राहिले आहे.
पण हे चांगल्या गुरुशिवाय समजत नाही.
म्हणून ज्ञानेश्वरांचे चरणी शरण जाण्याचा एकच उपाय आम्ही करतो.

१९५

रसभरी सर्व दिसते ब्रह्मांड । सांगे पंचतुंड सकळांसी ।।१।।
रसाचेनि बळे रासशब्दवाटे । भक्तिरसावाटे जाता देखू ।।२।।
जाणे येणे करी मिथ्या नारायण । समस्त प्रमाण खंडुनीया ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या प्रमाणा रहित । हरिपायी हित धरुनी बैसे ।।४।।

*चिंतन :-*

*भगवान शंकर सर्वांना सांगतात -*

*सारे ब्रह्मांड भक्तिरसाने भरलेले दिसत आहे.*

*रसाच्या आधिक्यामुळे रास हा शब्द तयार झाला आहे.*

*या मनोहारी रासाचा उत्सव भक्तीरसाच्या वाटेने गेले असता पाहण्यास मिळतो.*

*अन् डोळ्यांचं पारणं फिटतं.*

*भगवान व्यापक आणि अद्वय आहे.*

*त्याचे जाणे-येणे मिथ्या असूनहि*

*श्रीकृष्ण जात येत असतो. अवतार घेतो, निजधामाला जातो, असे सांगितले आहे.*

*हे सर्व जाण्यायेण्याचे ऐतिहासिक पुराव्यांचे मला काय करावयाचे आहे?*

*मी त्या सर्वांचे खंडन करतो.*

*भगवंताच्या रासक्रीडेचे प्रमाण असो की नसो, रासातच माझे हित आहे.*

*असे समजून हरीच्या पायाशी मृदंगवादिका गोपी होऊन बसतो म्हणजे झाले.*

१९६

*प्रसादाची वाट पाहतो तातडी । परी तोंडा गोडी ऐसी यावी ।।१।।*
*यशोदेसी द्यावा पुत्रत्वप्रसाद । संत ते प्रबुद्ध सुखी करा ।।२।।*
*दुर्जनांसी द्यावी मारुनिया मुक्ति । गोपाळासी भक्ति मित्रपणे ।।३।।*
*गोपिकांसी द्यावे प्रेमे आलिंगन । उद्धरावे जन सर्व मूढ ।।४।।*
*विश्वदास्य आम्हां द्यावा जी प्रसाद । ज्ञानेश्वरी शुद्ध प्रेम द्यावा ।।५।।*

*चिंतन :-*

*अतिशय घाईने प्रसादाची वाट पाहतो ०पण तोंडाला अशी गोडी आली पाहिजे की बस!*

*यशोदेला तुम्ही पुत्र म्हणून भेटावे. ज्ञानी संतांना भक्ती-देऊन सुखी करा.*

*दुर्जनाला मारावे आणि मुक्ती द्यावी, अन् गोपाळांना सख्य भक्ती द्यावी.*

*गोपिकांनी प्रेमाने आलिंगन द्यावे आणि सर्व मूढ जनांचा उद्धार करावा.*

*विश्वाची दास म्हणून सेवा करता यावी असा प्रसाद आम्हाला द्यावा.*

*आणि ज्ञानेश्वरांचे ठायी शुद्ध निष्कपट प्रेम द्यावे.*

१९७

*एकदेशीय ही मूर्तिच आवडे । व्यापकी न जडे चित्त तैसे ।।१।।*
*निर्गुणाहुनी या सगुणीच प्रेम । लाधेल उत्तम संतसंगे ।।२।।*
*दृष्टिभरी देव अंतरी आनंद । वदनी गोविंद रामकृष्ण ।।३।।*

ऐसियाच्या सदा जाऊ लोटांगणी । वाहूं हे चरणी सर्वत्र की ।।४।।
मुक्तिचतुष्टय तुच्छष्टी पाहू । प्रेमे क्षेम देऊ गोपीकान्ता ।
ज्ञानेश्वरप्रभुनाम मुखे गातां । मग भवचिंता कोणा वाटे ।।६।।

चिंतन :-

एकदेशीय सगुण मूर्तीच मला आवडते कारण व्यापकाचे ठिकाणी मन जडत नाही.
निर्गुणापेक्षा सगुणाचे ठिकाणी प्रेम पाहिजे असेल तर ते संतांच्या सहवासानेच उत्तम प्रकारे मिळेल.
दृष्टिसमोर सगुण देव आणि अन्त्यात आनंद आणि मुखात गोविंद रामकृष्णादि नामस्मरण.
अशी ज्याची स्थिती आहे त्यांना नेहमी लोटांगण घालू. आणि आमचे सार सर्वस्व त्यांचे चरणी अर्पण करू.
चारही मुक्ती भक्तीचे दृष्टीने तुच्छच आहेत. असे पाहून आम्ही गोपींच्या कांताला प्रेमाने प्रेमालिंगन देऊ.
ज्ञानेश्वरप्रभूंचे नाव मुखाने गाईले असता मन संसाराची चिंता कोणला वाटणार आहे.

१९८

झाली तैसी केली सेवा । आवडो नावडो देवा ।।१।।
आम्हां मागणे ते काय । तरी धरावे जी भय ।।२।।
जरी कराल प्रसाद । तरी हेचि द्यावे शुद्ध ।।३।।
ज्ञानेश्वरचरणांवरी । सदा करावी चाकरी ।।४।।

चिंतन :-

देवा तुम्हाला आवडली असेल किंवा नसेल,
जशी जमली तशी सेवा केली.
तुम्ही आमचं भय कशाला धरतां?
आम्हाला तुमचे जवळ काय मागायचे आहे? काहीच नाही.
जरी प्रसाद द्यावयाचीच इच्छा असेल तर एकच शुद्ध गोष्ट द्यावी अन् ती म्हणजे तुमची सेवा सर्वदा मला द्या. येवढेच मागणे.

१९९

तुजऐसे डोळां दिसती सुंदर । परी हे अंतर धांव नेघे ।।१।।
तुजऐसे बहू करिती गायन । परी माझें मन धांव नेघे ।।२।।
बहुतांच्या आंगी तुजऐशा शक्ति । परी नये चित्ती कांही माझ्या ।।३।।

काय ही असेल तुझी गा मोहनी । केले जनी वनी वेडे मज ।।४।।
ज्ञानेश्वरप्रभुतात उपदेश । ऐसेचि विशेष अनिर्वाच्य ।।५।।

चिंतन :-

तुझ्यासारखे सुंदर दिसणारे पुष्कळ आहेत पण माझे अन्तःकरण तिकडे धाव घेत नाही.
तुझ्यासारखे गायन करणारेही पुष्कळ आहेत पण माझे मन तिकडे जात नाही.
तुझ्यासारख्या शक्ती पुष्कळांजवळ आहेत पण माझ्या चित्ताला त्या पसंत पडत नाहीत.
मला मोहून टाकणारी शक्ती तुझ्याजवळ अशी आहे की सर्व समाजात असो की एकांतात वनात असो, मला वेड लावले आहे.
ज्ञानेश्वरतातांचा उपदेशच असा विशेष अनिर्वाच्य आहे की माझे मन दुसरीकडे जाऊच शकत नाही.

२००

कोणा असो पूर्ण ज्ञान । कोणी करो धर्मदान ।
कोणा येवो योग ध्यान । मज अभिधान हरीचे पुरे ।।१।।
कोणी करो वेदाध्ययन । कोणी स्थापो देवार्चन ।
कोणी पुस्तके वाचोन । बहु भाषण करोत ।।२।।
कोणा असो तीव्रबुद्धि । कोणी भोगो अष्टसिद्धी ।
कोणा होवो पुण्यवृद्धि । मी जो गुणनिधी हरी सेवी ।।३।।
कोणी करो रागरंग । कोणी करो मते भंग ।
कोणी चालो का बेढंग । मज संग श्रीहरीचा ।।४।।
कोणी घेवो नित्य मुक्ति । कोणा येवो शास्त्रयुक्ति।
मज द्यावी प्रेमभक्ति । हेचि उक्ति प्रार्थितो ।।५।।
कोणा सामर्थ्य अचाट । देव दावितातो स्पष्ट ।
माझा तैसा नाही हठ । हृदयी प्रगट मात्र व्हावे ।।६।।
आतां कासया बोलणे । संतसंग आचरणे ।
दृढ विश्वास ठेवणे । ज्ञानेश्वरचरणी ।।७।।

चिंतन :-

कोणाला पूर्ण ज्ञान असो, कोणी धर्माप्रमाणे दान करो, कोणी योग ध्यानात पारंगत असो, मला हरीचे नाम पुरे आहे.
कोणी वेदाध्ययन करो, कोणी देवाची पूजा यथास्थित करो, कोणी पुस्तके वाचून उत्तम भाषणे करोत.

कोणाला अत्यंत तीव्र बुद्धी असो,
कोणी अष्टासिद्धीचे भोग भोगोत.
कोणी पुण्याची वृद्धी करो,
मी फक्त गुणांचा सागर श्रीहरी त्याची सेवा करीन.
कोणी रागरंग करोत की कोणी लोकांची मते खोडून काढोत,
कोणी वाटेल तसे वागो,
मला हरीचा संग पुरेसा आहे.
कोणाला नित्य मुक्ती आवडो,
कोणी शास्त्राभ्यास करून त्यातील युक्तीत पारंगत होवो,
मला फक्त प्रेमभक्ती द्यावी हीच प्रार्थना करतो.
कोणाला देवाचा साक्षात्कार करून देण्याचे अचाट सामर्थ्य असो,
मला त्याची गरज नाही.
तुम्ही फक्त माझे हृदयात प्रकट व्हावे.
आता अधिक बोलणे कशाला हवे, संतसहवास करावा
आणि ज्ञानेश्वरांचे चरणी दृढ विश्वास ठेवावा हेच बरे.

२०१

ॐ नमो नारायणाय

सोडोनिया कर्म दाखवी उपास्ति । त्याची होय वस्ती अंधतमी ।।१।।
उपास्ती सांडोनि कर्म जो आचरी । भोगी यमपुरी यातनेते ।।२।।
कर्म उपासना एकवेळ करा । ब्रह्मज्ञानधारा सावरोनी ।।३।।
ईशावास्य श्रुति काढिला गुह्यार्थ । बोलिला समर्थ निगम हा ।।४।।
कर्म भक्ति ज्ञान योग आणि विरक्ति । सर्व येती पंथी आत्मारामी ।।५।।
वाच्यांश लक्ष्यांश हरिरूप झाले । प्रत्ययासी आले विश्व एक ।।६।।
पांचाही भेदांची होय ओवाळणी । अभेद कहाणी दृष्टी दिसे ।।७।।
नाही नर नारी आणि नपुंसक । गोपींचा नायक पुढे उभा ।।८।।
नादबिंदुकळा जाहली शिराणी । केला चक्रपाणी कांत जेव्हां ।।९।।
श्रुतिस्मृति पुराणादि इतिहास । जया सावकाश वर्णिताती ।।१०।।
ते गुह्य सगुण राहिले हृदयी । आकळोनि पायी चित्त माझे ।।११।।
मग तुम्हा आम्हा एकचि ठिकाण । गेला विसरुन भेदभ्रम ।।१२।।
नारायण भक्त, देव नारायण । विश्वा अधिष्ठान नारायण ।।१३।।

नारायण शांति नारायण कांति । जिव्हा ओठ दंती नारायण ।।१४।।
नारायण तालू नारायण कंठ । स्थाने व्यापी अष्ट नारायण ।।१५।।
नारायण हे चतुराक्षरी ब्रह्म । ॐकार हे नाम एकाक्षरी ।।१६।।
नमस्कार मध्ये घालोनी करावे । चतुर्थी लावावे विभक्तीते ।।१७।।
ॐ नमो नारायणायेति मंत्र । स्मरावा पवित्र जीवे भावे ।।१८।।
देह कर्म करी, मने उपासना । जीव ब्रह्मज्ञानामाजी मिळे ।।१९।।
आता जे उरले उपकारासाठी । ते गुह्य शेवटी ज्ञानेश्वर ।।२०।।

चिंतन :-

शास्त्रानुसार करावयाचे स्वकर्म सोडून जो केवळ उपासना करतो तो अंधतम नरकात जातो.

उपासना सोडून नुसते कर्माचरण करतो तो सुद्धा यमपुरीत दुःख भोगतो.

कर्म आणि उपासना एकाच वेळी दोनही केल्या पाहिजेत.

त्यातही ब्रह्मज्ञानाची अखंड धारा कायम असावी.

असा कर्म,उपासनाव मुमुक्षा हे तिन्ही मिळून असावेत, असा ईशावास्य उपनिषदात वेदांचा उपदेश आहे.

परमार्थ मार्गाला लागले की- कर्म, भक्ति, ज्ञान, योग, विरक्ती हे सर्व आपली सोबत करतात.

सामवेदातील..तत्वमसि हे ब्रह्मज्ञान करून देणारे महावाक्य.

त्यातील त्वं पदाचे व तत्पदाचे वाच्यांश लक्ष्यांश हरिरूप होऊन जातात म्हणजे-

आत्मज्ञानियाला सगुण भगवंताची भक्ती प्राप्त करून देतात.

विश्वातील पदार्थांचा परस्पर भेद नाहीसा होतो, ते सारे ब्रह्मरूप होतात.

त्या वेळी पंचमहाभूतांची ओवाळणी केली जाते,

आणि सर्वत्र अभेद आहे असा प्रत्यय येतो.

जो नर नाही, नारी नाही. नपुंसक नाही, तर सर्वांहून वेगळा असलेला भगवान् श्रीकृष्ण पुढे उभा दिसतो.

मी त्याला कांत म्हणून वरले तेव्हा योगातील अनाहत नाद, बिंदुदर्शन वगैरे सारे महत्वाचे विशेष, मोडीत निघाले.

अशा यश्रीकृष्णाचे वेद, स्मृति, पुराणे आणि महाभारतादी इतिहास सतत वर्णन करीत असतात.

माझेसाठी सगुण साकारलेले ब्रह्म गुह्यात गुह्यतम आहे.

तेच माझ्या हृदयात मी पहात आहे.
त्याच्या चरणी माझे चित्त जडले आहे.
असे होताच तुम्हा आम्हा सर्वांचा भ्रम निरसन झाला आणि
तुम्ही आम्ही एकाच ठिकाणी जाऊन पोचलो.
देव आणि भक्त हे दोन नसून एक नारायणच आहेत.
विश्वाला आधारहि नारायण आहे.
शांति, कांति, सौंदर्य सर्व नारायण आहे.
जिव्हा, ओठ, दांत मुखांदिकांनी नारायणाचे नाव उच्चारले जाते म्हणून त्यांच्यातही तोच भरला आहे.
तालू, कंठ वगैरे सर्व आठ स्थाने नारायणानेच व्यापिली आहेत.
ॐकार हे एकाक्षरी ब्रह्म आहे, तर नारायण हे चतुराक्षरी ब्रह्म आहे.
ॐकार आणि नारायण यांना नमो म्हणून नमस्कार असो.
.. ॐ नमो नारायणाय..हा मंत्र चारही वाणींनी सतते जपत असावे.
देहाने कर्मे करावीत.
मनाने उपासना करावी.
ब्रह्मज्ञानाने त्यात मिळून जावे.
केवळ लोकांवर उपकार करण्यासाठी समष्टीत व्यष्टिरूपाने
आत्मब्रह्म साकारले आहे,
ते आहे, आपले ज्ञानेश्वर महाराज !

२०२

देव निजलीया करणे भजन । मानिताति जन गौण यासी ।।१।।
दासीचे कर्तव्य रात्रीस जागणे । स्वामीनाम घेणे भलतेवेळी ।।२।।
तैसा संप्रदाय आमुचिये घरी । कोणा कैसी परी सुखे वाटो ।।३।।
आम्हां ज्ञानेश्वर-आज्ञाचि प्रमाण । तेथे समाधान पूर्ण वाटे ।।४।।

चिंतन :-
(श्री महाराज दिवसा बरेच वेळा निजत आणि रात्री त्यांचा पूजादि प्रवचनादि व्यवहार चालत असे. त्यानुसार हे मनोगत या अभंगात व्यक्त झालेले असावे.)
देव झोपल्यानंतर भजन करीत राहणे याला इतर भक्ति सांप्रदायात गौण समजले जाते. पण दासीचे कर्तव्य स्वामी निजले असताना पहारा करीत जागणे असे आहे. त्यामुळे मी स्वामीचे नाम कोणतेहि वेळी, रात्रीहि घेत असतो.)

असा आमचा संप्रदाय आहे कोणाला त्याचे काहीही वाटो.
आम्हाला सर्वत्र एक ज्ञानेश्वरमहाराजांची आज्ञाच प्रमाण आहे.
त्यातच आमचे पूर्ण समाधान आहे.

२०३

दासीच्या वचना रूची नाही जना । म्हणोनिया मना क्षोभू नये ।।१।।
योग्यासीचि कोणी देतो योग्य मान । तूं तो मानामान सर्व सांडी ।।२।।
आहेत बहुत जगाचे सदगुरू । तेचि विश्वोद्धारु करतील ।।३।।
तूं तो सांडी सर्व आता उचापती । मानोनी श्रीपति स्वामी एक ।।४।।
जन म्हणताती श्रीकृष्णाचि दासी । हेचि आपणासी पुरे झाले ।।५।।
दास्यपण आता जगी दाखवावे । यश मिरवावे श्रीकृष्णाचे ।।६।।
श्रुतिस्मृति सर्व श्रीहरीच्या आज्ञा । तेथे स्थिर प्रज्ञा ठेवी मना ।।७।।
सेवकासी आज्ञा स्वामीची प्रमाण । तेथे हूंचूंपण कामा नये ।।८।।
तुकाराम-आप्त वचन प्रमाण । अभंगी शोधून पहावे की ।।९।।
म्हणोनिया दास्य एक वाढवावे । जगचि वंदावे कृष्णरूप ।।१०।।
विश्वाचा सेवक तेंचि स्वामीपण । जाणताती खूण संत हे की ।।११।।
ज्ञानेश्वरतात दीनबंधु आम्हा । केले आत्मारामा कृष्णमय ।।१२।।

चिंतन :-

मी भगवंताची दासी आहे. माझे बोलणे ऐकून घेण्याची आवड लोकांना कशी असणार, म्हणून हे मना क्षोभ करू नकोस.
कोणी जरी मान देणार ते योग्य व्यक्तीलाच, म्हणून तू सर्व मान अपमान सोडून दे.
जगाला उद्धार करणारे सद्‌गुरु पुष्कळ आहेत. तेच विश्वाचा उद्धार करतील-
तू कशाला चिंता करतोस.
तू जगदोद्धाराच्या सर्व उचापती सोडून दे आणि श्रीपतीला तुझा व जगाचा स्वामी समजून स्वस्थ राहा.
मला लोक श्रीकृष्णाची दासी म्हणतात. हेच मला पुरेसे आहे.
हा दास्यभाव जगाला दाखवून द्यावा आणि श्रीकृष्णाचे यशाची कीर्ति सर्वत्र मिरवावी.
श्रुतिस्मृति हे सर्व भगवंताच्या आज्ञा आहेत.
तेथे हे मना आपली निश्चयात्मक बुद्धी स्थिर ठेव.
सेवकाने स्वामीची आज्ञा पूर्ण प्रमाण मानून तसे वागावे, तेथे किंतु काढीत बसू नये.
सर्वोत्तम आप्त असे श्रीतुकारामांचेहि वचन यासाठी प्रमाण आहे. ते अभंगात शोधून

पहावे.
म्हणून दास्यभक्ती वाढवून जगाला कृष्णरूपाने वंदन करावे.
विश्वाचा सेवक आहे तोच जगाचा स्वामी आहे, ही खूण संत जाणतात.
।। लघुत्वाचेनि मुद्दले । बैसला गुरूत्वाचे सेले ।। अमृ.
ज्ञानेश्वरतात हे आम्हा दीनांचे बंधू आहेत.
त्यांनी आमच्या आत्मारामाला कृष्णमय करून टाकले आहे.

२०४

गवळियांच्या हाती अन्न भक्षी देव । आम्हां जातिभाव परिपूर्ण ।।१।।
म्हणोनियां देवाहूनि उंच कर्म । परी का ते चरम फळ नाही ।।२।।
तरी हा देवचि करी आवरण । आता तया भेण पळू नये ।।३।।
माहेरीचे धन आणोनियां घरा । बळे वश करा स्वकांताते ।।४।।
ज्ञानेश्वरगृही धना नाही वाण । जामात हे ऊण हरिकुळ ।।५।।

चिंतन :-
गवळ्याच्या हातचे अन्न भगवान् भक्षण करतो
आणि आम्हाला जातिभेद पाळावयास सांगतो.
म्हणून देवाहून कर्म उच्च आहे पण त्याचे फळ श्रेष्ठ कां नाही ते कळत नाही.
हा देवच मायेचे आवरण घालून आपल्याला फसवितो. म्हणून त्याच्या भीतीने पळूं नये.
म्हणून आता आळंदी माहेराहून धन आणून पति कृष्णाला वश करा.
ज्ञानदेवांच्या घरी धनाला काही कमी नाही. उलट हरिचे कुळच त्याहून कमी दर्जाचे आहे. हे लक्षात घ्या.

२०५

श्रीनारदांचे दर्शन

जयाचिये स्मरणी दर्शनाचा पांग । फिटे ऐसे चांग महिमान ।।१।।
तो हा ब्रह्मसुत देखियला डोळा । ध्यानस्थ बैसला महाराज ।।२।।
साधावया कार्य इच्छिले आपुले । पाहिजे प्रार्थिले स्वामीस या ।।३।।
मनी पुजोनिया करू नमस्कार । नाहीच संभार पुष्प जवळी ।।४।।
अथाऽतो भक्तिं व्याख्यास्याम: सूत्र । प्रवेश पवित्र कर्णीं करो ।।५।।
ज्ञानेश्वरकृपे ब्रह्मसूत मुनी । पाहिला लोचनी बाईयांनो ।।६।।

चिंतन :-
नुसत्या स्मरणमात्राने जे दर्शन देतात, असा त्या ज्यांचा महिमा आहे ते ब्रह्मसुत

नारदमुनी ध्यानस्थ बसलेले मी पाहिले.
आपले कार्य म्हणजे भक्तिसूत्रांचा आशय समजण्यासाठी श्री नारदाचार्यांनाच प्रार्थना केली पाहिजे.
पुष्पसंभार नसल्याने केवळ मनाने पूजा करून नमस्कार करू.
भक्तीचे प्रथम सूत्र आमच्या श्रवणेंद्रियात प्रवेश करून कानांना पवित्र करो.
ज्ञानेश्वरांच्या कृपेने नारदमुनींना डोळ्यांनी पाहण्याचे भाग्य,
हे सख्यांनो मला लाभले.

२०६

दुःखामध्ये टाहो फुटेना बळकट । म्हणोनिया स्पष्ट चित्ती ध्याऊ ।।१।।
जेव्हा भूमीवरी येसी नारायणा । ओवाळू चरणाहूनी देह ।।२।।
जीवभाव तुज करुं समर्पण । मग ते विंदान तुझे तुला ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या मानोनिया दासी । देई मुशाऱ्यासी प्रेमभक्ति ।।४।।

चिंतन :-
संसारातील दुःखामध्ये टाहो फोडून तुला हाका मारता येत नाही, म्हणून चित्तामध्ये ध्यानाने तुला स्पष्ट करू.
जेव्हा तूं भूमीवर अवतार धारण करून येशील तेव्हा हा देह तुझ्या चरणावरून ओवाळून टाकू.
जीवभाव तुला समर्पण करू, म्हणजे त्याचे जे काय करायचे ते तूं कर.
ज्ञानेश्वरकन्येला दासी मान आणि इनाम मुशारा म्हणून प्रेमभक्ती दे.

२०७

हारपावा देहभाव । मनबुद्धि व्हावी वाव ।।१।।
ऐसी वाढो उपासना । जळो संसार वासना ।।२।।
सुटो ज्ञान-अभिमान । न स्पर्शोत दंभ मान ।।३।।
हृदयी वृंदावन राही । शिरी ज्ञानेश्वर आई ।।४।।

चिंतन :-
देह बुद्धी नाहीशी झाली की मन बुद्धी खोटच्या ठरतात.
उपासना खूप वाढो आणि संसाराची वासना जळून जावो.
ज्ञानाचा अभिमान नाहीसा होवो । दंभ मान यांचा स्पर्श न होवो.
हृदयात वृंदावनाचं ध्यान राहो आणि मस्तक ज्ञानेश्वर माऊलीच्या चरणी स्थिर होवो.

२०८

*विश्वासे आदरे सेवीन चरण । जनन मरण निवारोनी ।।१।।*
*सगुण साकार पाहीन मी डोळा । शांतीचा सोहळा मेळवीन ।।२।।*
*करीन श्रवण आवडीने कथा । समन्वयपथा लावोनियां ।।३।।*
*ज्ञानेश्वरकन्या झाली हरिदासी । आता भवपाशी न पडेचि ।।४।।*

*चिंतन :-*

*विश्वासाने आणि आदरपूर्वक जन्ममरणाचे निवारण करून श्रीहरीचे चरणांची सेवा करीन.*
*सगुण साकार डोळ्यांनी पाहून शांतीचा सोहळा मिळवून घेईन.*
*प्रेमाने हरिकथा श्रवण करताना समन्वय करून त्यांचा आनंद घेईन.*
*ज्ञानेश्वरकन्या हरीची दासी झाली त्यामुळे संसारबंधनात कधीच पडणार नाही.*

२०९

*श्रीहरीच्या प्रेमी घालिती फुगड्या । कंचोळी लुगड्या विसरूनी ।।१।।*
*उघडपणाने वरिला श्रीकृष्ण । गुणांही वितृष्ण पावोनिया ।।२।।*
*वैराग्याच्या भावे वर्णिला श्रृंगार । तापे भवगर निवारिले ।।३।।*
*तयांचे चरणी साष्टांग नमन । अन्यत्र न मन कोठे राहो ।।४।।*
*कृपा करितील जेव्हा ब्रजबाळा । तरीच गोपाळा होय भेटी ।।५।।*
*म्हणोनिया आधी वंदिल्या गोपिका । वैकुंठनायका मग नमूं ।।६।।*
*ज्ञानेश्वरकृपा सगुण निर्गुणी । शांतिब्रह्मपणी नायकती ।।७।।*

*चिंतन :-*

*श्रीहरीच्या प्रेमाने अंगावरील कपड्यांचीहि शुद्ध हारपून गोपिका फुगड्या खेळतात.*
*गुणांची देखील तृष्णा नाहीशी होऊन गोपींनी उघडपणे श्रीकृष्णाला पति मानले. (अपमान सहन करून) दुर्गुणी म्हणवूनही)*
*अंतरात विषयांविषयी तीव्र वैराग्य असले तरी त्यांनी भगवंताच्या श्रृंगाराचे वर्णन केले.*
*त्यातील विरह तापाने संसाररूपी विष दूर केले.*
*अशा गोपींच्या चरणांवर साष्टांग नमस्कार करतो. माझे मन त्यांना सोडून इतर कोठेही न रमो.*
*गोपींनी कृपा केली तरच श्रीकृष्णाची भेट होणे शक्य आहे.*
*म्हणून आधी गोपींना नमस्कार करून नंतर वैकुंठनायकाला नमन करू.*
*परब्रह्म हे शांतस्वरूप आहे.*

निर्गुण निराकार आहे. पण गोपी त्याकडे लक्ष देत नाही असे पाहून ज्ञानदेवांनी त्या निर्गुण स्वरूपाला, त्या शांती ब्रह्माला सगुण साकार केले. आणि गोपींना पती मिळवून दिला.

२१० / शिवस्तुति

सकलहि मंत्रा तेचि एक बीज । प्रणवाचे निज म्हणती श्रुति ।।१।।
तेचि भक्तासाठी साजिरे सगुण । आंगे गौरवर्ण प्रकाशले ।।२।।
माथां निशापति जटेत जान्हवी । वामांक शोभवी हिमबाळा ।।३।।
गोविंदनामाची अत्यंत आवडी । शिवनामी गोडी गोविंदाही ।।४।।
सोहंभावे दोन्ही होउनिया एक । आळंदीनायक ज्ञानेश्वर ।।५।।

चिंतन :-

सर्व मंत्रांचे मूळ बीज भगवान शंकर आहेत.
ॐकाराचे निजस्वरूपही तेच.
असे ते बीज भक्तासाठी सुंदर सगुण झाले.
गौरवर्ण घेऊन शरीर धारी होऊन प्रकट झाले.
कपाळावर चंद्र, जटेत गंगा आणि डाव्या मांडीवर भगवती उमा,
असे शिवकुंबाचे स्वरूप व्यक्त झाले.
अशा भगवान् शंकरांना गोविंद या नामाची अत्यंत आवड आहे
त्याप्रमाणे श्रीकृष्णाला शिवनामाची आवड आहे.
दोघेही परस्परांच्या नामांचा सतत जप करीत असतात.
सोहं या महावाक्यामध्ये दोघेही एकरूप होऊन जातात.
आणि ते ऐक्यरूप म्हणजेच माझे ज्ञानेश्वर महाराज होत.

२११ / आळंदीची वाट

आळंदीची वाट सुखाची सकळा । समर्था दुर्बळा प्राणियांसी ।।१।।
होवोनियां चला मोकळ्या मनाचे । पहावे गुणाचे परब्रह्म ।।२।।
सखा ज्ञानेश्वर स्वामी मायबाप । श्रीहैबतीराय श्रेष्ठ बंधु ।।३।।
बहीण इंद्राणी परम प्रीतीची । गोष्टी ही प्रीतीची ऐकावया ।।४।।
कैवल्य माहेर माझे अलकावती । अखंड संचिती जोडले हे ।।५।।
ज्ञानेश्वरकन्या माहेराच्या सुखे । वारोनिया दुःखे स्थिरबुद्धि ।।६।।

चिंतन :-

समर्थ असो की दुबळा असो सर्वांना आळंदीची वाट चालून जाणे सुखाचे आहे.

मनात शंका कुशंका न धरता मोकळ्या मनाचे होऊन आळंदीला चला आणि सुखाचे परब्रह्म पहा.

ज्ञानदेव हे सखा आहे.

स्वामी आहेत.

मायबाप आहेत.

आणि श्रीहैबतीराय हे वडील बंधू आहेत.

इंद्रायणी ही प्रेम करणारी बहीण आहे ती मनातल्या गुज गोष्टी ऐकते.

माझी आळंदी हेच कैवल्य असून माझे माहेर आहे.

हेच माझे नित्य राहणारे संचित आहे.

ज्ञानेश्वर कन्या माहेराच्या सुखानी जशी रममान होते तशी बुद्धी स्थिर होते.

२१२ / आळंदी

नमो ती आळंदी संतांच माहेर । नमो कांतपुर वृंदावन ।।१।।
नमो हिमालय उमाशिव-स्थान । उद्धरती जन हेळामात्रे ।।२।।
नमो मायबाप ज्ञानेश्वरराणा । इंद्राणी सुजाणा वंदू भावे ।।३।।
नमो ते राधिका रुक्मिणी गोविंद । यशोदा आणि नंद गोपीनाथ ।।४।।
नमो हैमवती नमो सदाशिव । धरूनीया भाव नमो नमो ।।५।।
नमो ती कालिंदी नमस्कार संता । ज्ञानेश्वरताता प्रेमे वंदू ।।६।।

अर्थ :-

संतांचं माहेर असलेल्या आळंदीला सतत नमस्कार असो.

माझ्या पतीचे गाव जे वृंदावन त्यालाही नमस्कार.

पाहिल्याबरोबर दृष्टिमात्राने लोकांचा उद्धार करणाऱ्या, शंकरपार्वतीचे स्थान असलेल्या हिमालयाला नमस्कार.

माझे मायबाप असलेल्या ज्ञानेश्वरमहाराजांना आणि त्यांचे समोर वाहत असलेल्या ज्ञानसंपन्न इंद्रायणी नदीला नमस्कार.

राधा, रुक्मिणी श्रीकृष्ण यशोदा आणि नंदराज या सर्वांना नमस्कार.

हिमालयाची कन्या पार्वती शिवंकर महादेव यांचेवर प्रेमभावाने नमस्कार.

यमुनेलाश संतांना आणि सर्व संतांचे शिरोमणी असलेल्या माझ्या ज्ञानदेवतातांना नमस्कार नमो नमः नमो नमः।।

२१३

कनकाचे ताटी सुधा । बुधा वाटताहे मुधा ।।१।।

श्रीगोविंद नामाविणे । नलगे ब्रह्मीचे साजणे* ।।२।। (*सुंदर)
अहो वैकुंठ कैलास । तेथ नावडे निवास ।।३।।
सदा संतांची संगति । ब्रह्ममय झाली मति ।।४।।
ज्ञानेश्वरतातमाता । कृपाकर ठेवी माथां ।।५।।

**चिंतन :-**

सोन्याच्या वाटीतील अमृत बुद्धिमानांनी मूर्खांना वाटणे, जसे अनुचित तसे भगवंताच्या नामाशिवाय परब्रह्माला साजरेपणा येत नाही.
भगवंताला वैकुंठ किंवा कैलासात राहणे आवडत नाही. संतसंगती आवडते.
संतांच्या सततच्या सहवासात बुद्धी ब्रह्ममय होऊन जाते, ब्रह्माचाच निश्चय असतो.
म्हणून हे ज्ञानदेवा मायबापा, आपला कृपाहस्त माझे मस्तकावर ठेवा.

२१४

(तावद्रागादयस्तेनास्तावत्कारागृहं गृहम । तावन्मोहोंऽघ्रिनिगडो यावत्कृष्ण न ते जनाः।।
- या श्रीमदभागवतातील श्लोकाचा भावार्थ धरून हा अभंग आहे)

(१ वृथा=व्यर्थ . २ अलंकार)

तोवरी तोवरी रागादि तस्कर । तुझ्या पायी शिर जंव नाही ।।१।।
तोवरी तोवरी सदन श्रृंखला । जंव तुझी लीला वाचे नये ।।२।।
तोवरी हा मोह धरितो आंगोठा । तुझा प्रेम मोठा चित्ती नये ।।३।।
जोवरी गोविंदा तुझे नाही आम्ही । तोवरी हा ब्रह्मी जीवपणा ।।४।।
एक वेळ तुझे धरलीया पाय । होतसे अपाय अवद्येचा ।।५।।
तुझे व्हाया आम्हां एकचि उपाय । ज्ञानेश्वरमाय आश्रयणे ।।६।।

**चिंतन :-**

कामक्रोधरागादि चोर रूपाने तोपर्यंतच असतात की जोपर्यंत तुझ्या पायावर मस्तक ठेवले जात नाही.
जोपर्यंत वाणीने तुझी लीला गायिली जात नाही तोपर्यंतच घर हे बंधन आहे.
तुझे उत्कट प्रेम चित्तात ठसत नाही तोपर्यंत मोह आंगठा पकडून ओढून नेतो.
जोपर्यंत हे गोविंदा, आम्ही तुझे प्रेमपात्र होत नाही तोपर्यंत ब्रह्माला जीवपणा राहणार.
तुझे एकदा पाय धरले की अविद्येचा नाश होऊन जातो.
आणि हे कृष्णा,आम्ही तुझे होण्याकरता एकच उपाय आहे अन् तो म्हणजे ज्ञानेश्वरमाउलीच्या पायांचा आश्रय करणे.

२१५

सुदिन आजीचा सोनियाची वेळा । पाहिला सावळां डोळेभरी ।।१।।
सगुण सुंदर मोहक रुपडे । कदा न सापडे अहंकारे ।।२।।
तप करु करु भागले तें ऋषी । नाकळे तयासी धुंडिताही ।।३।।
तो हा गोकुळांत गौळियाचा बाळ । जया भितो काळ थरथरा ।।४।।
वेदान्ती म्हणती जयाला निर्गुण । ज्यासाठी स्मशान शिव सेवी ।।५।।
ज्योतिष्टोमयागी म्हणता स्वाहा स्वाहा । एक ग्रास पहा घेत नाही।।६।।
तो हा गोपीगृही चोरिताहे दूध । नवल प्रसिद्ध कैसे बाई ।।७।।
हृदयीच्या एका शुद्ध प्रेमावीण । वश नारायण नाही नाही ।।८।।
कात्यायनिकृपे ज्ञानेश्वरबाळा । कृष्णकंठी माळा प्रेमे घाली ।।९।।

**चिंतन :-**

आज सावळा श्रीकृष्ण डोळे भरून पाहिला.
हा उत्तम दिवस आहे. ही सोन्याची वेळ आहे.
हे भगवंताचे सगुण सुंदर मोहक रूप अहंकार असेल तर कधीही प्राप्त होत नाही.
जन्मोजन्म तप करून करून ऋषी थकून गेले.
शोधूनही त्यांना हे रूप सांपडत नाही.
असा श्रीकृष्ण गोकुळात गौळियाचे लेकरू झाला.
त्याला काळ देखील थरथर कांपतो.
वेदान्ती त्याला निर्गुण म्हणतात.
भगवान् शंकर त्याचेसाठी स्मशानात राहतात.
ज्योतिष्टोम यज्ञ करणारे स्वाहाकार करूनही तेथे हा एक घासही ग्रहण करीत नाही.
तो हा गोपिकांचे घरी दूधलोणी चोरून खातो. कसे नवल आहे नाही?
हृदयातील एका शुद्ध प्रेमाशिवाय हा नारायण कधी कोणाला वश होत नाही.
परंतु कात्यायनी देवीच्या प्रसादामुळे ही ज्ञानेश्वरकन्या कृष्णाच्या गळयात प्रेमाने वरमाला घालीत आहे.

२१६

देवा दिधले वचन । ते त्वां पूर्ण पाळिले ।।१।।
आता आला भरंवसा । नाही ऐसा कृपाळू ।।२।।
मागे न होते ठाऊक । तेणे चूक घडली ।।३।।
ज्ञानेश्वर मायबापा । सर्व तापा वारिले ।।४।।

**चिंतन :-**

हे देवा, तूं जे वचन दिलेस ते पूर्ण पाळलेस.
म्हणून आता गेला भरंवसा आला की तुझ्याशिवाय इतका कृपाळू कोणी नाही.
पूर्वी तू इतका भरंवशाचा असशील हे ठाऊक नव्हते म्हणून तुझा विश्वास धरला नाही ही मोठी चूक झाली.
हे ज्ञानेश्वरा मायबापा तूच माझी सर्व दुःखे दूर केलीस.

२१७

सर्व सुखसार । शारंगधर देखिला ।।१।।
आता हारपली चिन्ता । भगवंता पाहोनी ।।२।।
झाला वासनेचा क्षय । नाही सोय कर्माची ।।३।।
सर्वाभूती पांडुरंग । संतसंग आवडी ।।४।।
तात आळंदीचा राणा । मुखी म्हणा निश्चये ।।५।।

**चिंतन :-**

सर्व सुखाचे सारभूत असलेला पांडुरंग आज पाहिला.
त्याला पाहून सर्व चिंता हारपून गेली.
वासनेचा क्षय झाला.
कर्म करण्याचे कारणच उरले नाही.
सर्व भूतांचे ठिकाणी पांडुरंग असल्याचा अनुभव आला
आणि संतसहवासाची आवड उत्पन्न झाली.
आळंदीश्वर ज्ञानदेव हे तात आहे. त्यांचे नामस्मरण दृढ निश्चयाने करा.

२१८ / संसारी कहाणी

होईल ते हो कां संसारी कहाणी । परी नारायणी तुटी नको ।।१।।
करोत का जन सुखे माझ्या निंदा । परी या गोविंदा तुटी नको ।।२।।
आठवण माझी न यावी कां कुळी । परी घननीळी तुटी नको ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या अवघे डावलोनी । एका चक्रपाणी वरुं पाहे ।।४।।

**चिंतन :-**

या संसारात माझी कशीहि फजीती होवो, पण नारायणापासून तुटी होऊ नये.
सर्व लोकांनी माझ्या अनेक प्रकारच्या निंदा केल्या तरी, गोविंदाशी तुटी नको.
माझ्या कुळातल्या सर्वांना माझे विस्मरण होवो पण घननीळाशी तुटी नको.
ज्ञानेश्वरकन्येने हे सर्व दूर लोटून एका भगवंताला वरमाला घालण्याची इच्छा केली.

२१९ / पंचायतन

उमा माता मज मांडिये घेवोनी । सुस्तन वदनी स्नेहे घाली ।।१।।
पिता शिव देतो कृष्णभक्ति ठेवा । संसारवैभवा निवारोनी ।।२।।
कांत कृष्ण हरी कामना सकळ । मग हे चंचळ चित्त नोहे ।।३।।
राधिकादि गोपी भगिनीसंगती । अखंड ही प्रीति वाढो लागो ।।४।।
ज्ञानेश्वर गुरू सर्व पुरवीता । कर्माकर्मचिंता निवर्तली ।।५।। (य९पू.४४)

**चिंतन :-**

उमामाता मला मांडिवर घेऊन स्तनातील प्रेमामृत पाजते.
संसारातील वैभव दूर करून पिता शिव हे कृष्णभक्तिरूप ठेवा देतात.
पति श्रीकृष्ण सर्व कामना दूर करतो मग हे चित्त कधीच विषयाकडे धावत नाही.
राधिकादी गोपींच्या सज्जनसंगतीत राहिले की भक्तिप्रेम अखंड वाढू लागते.
ज्ञानेश्वर गुरुमहाराज सर्व कामना पूर्ण करतात म्हणून कर्म केलेल पाहिजे इ. सर्व चिंता दूर होतात.

२२० / (हिंदी)

कुछ और जुदा मेरे मन नाही । चित्त तुम माही जबसो है ।।१।।
गोविंद ध्यान मों गोविंद मन मों । जागत स्वप्न मों गोविंदही ।।२।।
इंद्रियनकी भी तुटी अभिलाखा । समभाव देखा भूतन में ।।३।।
आलंदी नृपाल नंदिनी प्रतीति । सगुण श्रीपती स्थाई भाव ।।४।।

**चिंतन :-**

चित्त जेव्हापासून तुझ्यामध्ये जडलं तेव्हापासून माझ्या मनात दुसरे काहीही नाही.
ध्यानामध्ये गोविंद आहे, मनातही गोविंद आहे. जागृतीत व स्वप्नातही गोविंदच आहे.
सर्व इंद्रियांच्या अभिलाषा नष्ट झाल्या आहेत. सर्व भूतांमध्ये एकपरब्रह्मच दिसत आहे.
आळंदीचा राजा त्याची मी कन्या आणि माझा स्थायी भाव म्हणजे सगुण भगवान श्रीकृष्ण हाच होय.

२२१ / अभिलाखा (हिंदी)

आंखिया सामने मूर्ति चाहूं तोरी । और नाहि मोरी अभिलाखा ।।१।।
इतनी मानिये अरज गोपाला । नंदजीके लाला दीनबंधू ।।२।।
अपने मूखसूं आसीस(१) कहिये । आ के रहिये हृदय मों ।।३।।(आशीर्वाद)
ज्ञानेश्वरकन्या बिनती सुनीके । प्रगट भे(२) निके आगे पिछे ।।४।।(२भये- झाले)

चिंतन :-

डोळ्यासमोर तुझी मूर्ती पाहवी- यापेक्षा अधिक अभिलाषा मला नाही.

हे नंदकुमारा, तू दीनांवर दया करतोस ना, तर येवढा माझा अर्ज स्वीकार कर.

आपल्या मुखाने ..आशीर्वाद आहे.. असे नुसते म्हण.

अन् मग दुसऱ्याच्या हृदयात जाऊन खुशाल रहा.

ज्ञानेश्वरकन्येची अशी विनंती ऐकल्याबरोबर भगवान् मागे पुढे सर्वीकडे प्रगट झाले.

२२२ / सगुणाची पूजा

लोखंडे लोखंड जैसे का तोडावे । मनाने मारावे मन तैसे ।।१।।

प्रतिमा घेउनी जडांश काढुनी । स्थापावे सगुणी आवडीने ।।२।।

दिसे डोळ्यापुढे सगुण सांवळे । सुखाचे कोवळे गोजिरवाणे ।।३।।

आळंदीवल्लभनंदिनीचा कान्त । एकान्त लोकान्त भरुनी आहे ।।४।।

चिंतन :-

लोखंडाच्या हत्याराने लोखंड तोडतात, तशा मनाच्या साह्यानेच मनोवासना नष्ट कराव्या.

धातू वगैरेची प्रतिमा उपासनेसाठी घ्यावी पण त्यातील जडांश मनाने काढून टाकावा आणि असे जडांशरहित सगुण प्रेमाने ध्यानात आणावे.

मग डोळ्यापुढे सगुण सांवळे कृष्णरूप दिसू लागले की, सुरेख अशा सुखाच्या सोहोळ्यांचा अनुभव येतो.

ज्ञानेश्वर कन्येचा कांत श्रीकृष्ण हा एकांत असो की लोकांत असो तोच एक सर्वीकडे भरून राहतो.

२२३

बहू दिसा झाल्या भेटी । होत्या गांठी पुण्याच्या ।।१।।

रूप पाहोनि सांवळे । तळमळ विराली ।।२।।

आता दूर पायाहूनी । चक्रपाणी न कीजे ।।३।।

मायबाप ज्ञानेश्वर । उपकार हा त्यांचा ।।४।।

चिंतन :-

पुण्याचं गाठोडं होत म्हणून प्रयत्न करता करता पुष्कळ दिवसांनी कां होईना, पण भगवंता, तुझी भेट झाली.

तुझे सावळे रूप पाहून सर्व प्रकारची दुःखाची तळमळ संपली.

हे चक्रपाणी कृष्णा, आता तुझ्या पायापासून तू दूर करू नकोस.

माझे आईवडील ज्ञानेश्वर महाराज आहे ना, त्यांच्याच उपकारामुळे तुझी प्राप्ति झाली.

२२४

लाभ आणि हानि जाणे नारायण । मज तो चरण आवडती ।।१।।
बंधन-कैवल्य ठाऊक देवास । मजला तो आस सत्संगाची ।।२।।
ज्ञान अज्ञानाचा न कळेचि पार । गाईन सुंदर गुण तुझे ।।३।।
ज्ञानेश्वरप्रभु माझा कृपावंत । करीत उचित माझे तैसे ।।४।।

चिंतन :-

माझ्या लाभ हानीची काळजी नारायणाला आहे. तोच काय ते जाणतो. मला मात्र त्याचे चरणच आवडतात.

बंध कोणता अन् मोक्ष तो काय, हे देवाला माहीत. मला संतसंगाची ओढ आहे.

अज्ञान कोणता अन् मोक्ष तो काय, हे देवाला माहीत. मला तर केवळ संतसंगाची ओढ आहे.

अज्ञान कोठपर्यंत व ज्ञान कोठून सुरू होते त्यांची मर्यादा कुठपर्यंत? मला कळत नाही. मी फक्त तुझे कीर्तिगुण गाईन.

माझे ज्ञानेश्वरप्रभु कृपावंत आहेत. मला उचित काय आहे हे त्यांना माझ्याहून अधिक कळते. ते योग्य तेच करतील.

२२५

आजिचे नवल देखियले डोळां । सगुण सावळा अंतर्बाह्य ।।१।।
प्रेम मैत्री दयोपेक्षा गेले भेद । अवघा गोविंद साजणीये ।।२।।
बंधाभावे नाही मुक्तीचा आदर । आवडे कुमर यशोदेचा ।।३।।
ज्ञानेश्वर माझा कल्याणनिधान । जीव ओवाळीन त्यांच्या पायी (य९उ.४५)

चिंतन :-

आज माझ्या डोळ्यांनी नवल पाहिले - सगुण सावळा भगवान् कृष्ण आत आणि बाहेर सर्वत्र व्यापून राहिला आहे.

प्रेम - मैत्री - दया - उपेक्षा हे सर्व भेद नाहीसे झाले. आणि सर्वत्र एक गोविंदच भरला असल्याचा अनुभव आला.

बंधाचा अभाव झाल्याने मुक्तीला कोण आदर देणार? मला मोक्षापेक्षा यशोदानंदन कृष्णच आवडतो.

माझा ज्ञानेश्वरसखा कल्याणनिधान आहे. त्यांच्या पायावर जीव ओवाळून टाकला आहे.

२२६

होईल ते हो या नारायण नामे । आणिक न कामे मोक्षादिक ।।१।।
जीव माझा जडे सुंदर सगुणी । विटले ये मनी विषयाते ।।२।।
मागे पुढे एक नाचे रंगनाथ । जाहले सनाथ बाइयांनो ।।३।।
सगुण निर्गुण शब्दमात्र भिन्न । एरव्ही विज्ञान समस्थिति ।।४।।
ज्ञानेश्वरकन्या सर्वांगे निवाली । आता जनी बोली बोल सुखे ।।५।।

चिंतन :-

नारायणाचे नामस्मरणाने जे काय व्हावयाचे ते होईल.
मला मोक्षादिंची वगैरे काही कामे नाहीत.
माझा जीव सगुण सुंदर भगवंतावर जडला आहे.
सर्व विषयांना मी मनापासून विटले आहे.
माझ्या सख्यानो, आता मी सनाथ झाले आहे.
माझा रंगनाथ श्रीहरी माझ्या मागे पुढे जणु काय नृत्य करतो आहे.
सगुण आणि निर्गुण हे शब्दच भिन्न भिन्न आहेत, पण त्यांचा अर्थ
समस्थितीत असलेले एक परब्रह्म असाच आहे.
मी संसारदु:खाने होरपळलेली ज्ञानेश्वरांची कन्या सर्वांगाने निवाली आहे.
आता लोकांनी मला कितीहि बोल लावले तरी मला त्याची पर्वा नाही.

२२७

मायबापबंधु सुत गणगोत । मरो हे समस्त नारायणा ।।१।।
आवडती एक तुझे सुंदर पाय । आणिक उपाय दु:खमूळ ।।२।।
तुष्टि पुष्टि क्षुधा नाश ग्रासोग्रासी । त्या भोजनाऐसी भक्ति वाढो ।।३।।
ज्ञानेश्वरप्रभु सोयरा सज्जन । तत्प्रीतीं मज्जन करी मना ।।४।।

चिंतन :-

आई वडील बंधू पुत्र वगैरे माझे सारे गणगोत मरून जावोत.
मला तुझे सुंदर पाय हेच आवडतात.
बाकीचे सर्व उपाय दु:ख देणारेच आहेत.
भूक लागली असता जेव्हा जेवायला बसतो तेव्हा प्रत्येक घासाने मन संतुष्ट होते,
शरीराला आलेला थकला नाहीसा होतो. पुष्टी मिळते. भुकेचा नाश होतो.
अशा भोजनाप्रमाणे माझे ठिकाणी तुझी भक्ती वाढो.
हे मना, ज्ञानेश्वरप्रभु हाच खरा सज्जन सोयरा आहे,
त्याच्या प्रेमामध्ये तूं आकंठ डुंबत रहा.

२२८

माझे वाचे तुवां गावा नारायण । दिधले म्हणून गोड खाया ।।१।।
परी त्वां शेवटी साधियेला दावा । नाही वासुदेवा आठवीले ।।२।।
मग तुजसाठी केली आटाआटी । वासना शेवटी वाढे तुझी ।।३।।
विश्वास दावोनी लोटिले संसारी । तूंचि मुख्य वैरी ओळखिले ।।४।।
आता तुम्हांविशी झाले उदासीन । जीव ओवाळीन स्वामीहूनी ।।५।।
तिन्ही काळी तुम्हां मज नाही नाते । जन्ममरणाते सुखे भोगा ।।६।।
मी तो सर्वसाक्षी गोविंदस्वरुप । उजळोनि दीप साधुकुळी ।।७।।
मग मन नेले सर्व जाणपणे । श्रीगुरु भजने तेही गेले ।।८।।
चहूंकडे झाले ज्ञानेश्वरपाय । व्यतिरेकान्वय बोल फोल ।।९।।

चिंतन :-

अग माझे जिव्हे, तू नारायणाचे गान करावे म्हणून मी तुला गोडधोड खावयास दिले.
पण तू मात्र शत्रूसारखा माझा सूड घेतलास, वासुदेवाचे स्मरणहि केले नाहीस.
मग तुला हे खायला देऊ की ते देऊ, यासाठी जन्मभर प्रयत्न करीत राहिलो
पण त्यामुळे तुझी वासना अधिकच वाढू लागली.
तू मला विश्वास दाखविला पण संसारातच पुनः लोटून दिले.
म्हणून माझी खरी वैरीण तूंच आहेस हे मी ओळखलं.
हे इंद्रियांनो, तुमचे माझे नाते मागे नव्हते, आता नाही व पुढेही राहणार नाही.
तुम्ही इंद्रियांनो आता खुशाल जन्म मरणांची दुःखे भोगत बसा.
मी सर्वांचा अन्तर्यामी साक्षी आहे. गोविंदस्वरूप आहे. साधूंच्या कुळात माझा जन्म झाला आहे. सत्कुळात माझी जीवनज्योती उजळून निघाली आहे.
मी सर्वज्ञ झाल्यामुळे मन नाहीसे झाले. पण पुढे तर
श्रीगुरूंच्या भक्तीने सर्वज्ञताही समाप्त झाली.
आता आंत बाहेर चहूं दिशांना एक ज्ञानदेवांचे चरणांचाच अनुभव आहे.
म्हणून व्यतिरेक आणि अन्वय हे वेदान्ताच्या अनुभवाचे दोन टप्पे आहेत- इ. बोलणेच खुंटले.

२२९ / संप्रदाय वाढो

कपाळी कुंकुम लावे याचसाठी । दिसावे शेवटी पाय तुझे ।।१।।
यासाठी मंगळसूत्राचा आयास । न पडावा फास यमाजीचा ।।२।।
जरी ब्रह्मज्ञाने पावलो निर्भय । तरी संप्रदाय वाढो पुढे ।।३।।

ज्ञानेश्वर माय ऐसेच करील । पदरी धरील विश्व सारे ।।४।।

चिंतन :-

`आयुष्याचे शेवटी तुझे पाय दिसावेत यासाठी

मी कपाळाला तुझ्या नावाने कुंकू लावीत आहे.
मेल्यानंतर यमाचा फांस पडू नये याचसाठी
तुझे नावाचे मंगळसूत्र गळ्यात घातले आहे.
जरी मला ब्रह्मज्ञान झाले आहे - मी निर्भय झाले आहे तरी
पुढे हा माधुर्यसंप्रदाय वाढावा असेच वाटते.
ज्ञानेश्वरमाउली असे नक्की करील आणि साऱ्या विश्वाला मातृवत्सल भावाने पदराखाली घेईल.

२३०

आता नको ब्रह्मज्ञान । मज येणे समाधान ।।१।।
जीव जडो तुझे पायी । आणिक नलगे दुजे काही ।।२।।
मुळीचे कळले । भेटी पातक जळले ।।३।।
स्वामी आळंदीच्या नाथा । कृपाकर ठेवा माथा ।।४।।

चिंतन :-

तुझ्या प्रेमाने माझे समाधान आहे आता ब्रह्मज्ञान नको.
माझ्या जीवाची ओढ तुझे पायाचे ठिकाणी लागली की मला दुसरे काही नको.
सर्व विश्वाचे मूळ तूच याचा अनुभव आला.
तुझी भेट झाली आणि सर्वच पातकांचा नाश झाला.
स्वामी आळंदीच्या नाथा, तुमचा कृपाहस्त मस्तकावर ठेवा म्हणजे झाले.

२३१

विडा त्रयोदशगुणी । तुम्ही घ्या वो चक्रपाणी ।।१।।
रिझवील तुम्हां ऐसी । येथे कोणी नाही दासी ।।२।।
वेडीवाकुडी हे सेवा । गोड करूनी घ्या देवा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या । माळ घाली विश्वमान्या ।।४।।

चिंतन :-

तेरा पदार्थ एकत्र करून केलेला विडा हे भगवंता तुम्ही खावा.
येथे तुम्हाला रिझवेल अशी कोणी दासी येथे नाही.

मी कशीतरी केलेली ही सेवा तुम्ही गोड करून घ्या.
हे कृपेच्या सागरा ज्ञानदेवा माझा अंगिकार करा.

२३२

सोनियाची वेळ । डोळां देखिले गोपाळ ।।१।।
कोटी जन्मीचे संचित । आघवेचि फलीभूत ।।२।।
चला चला बारा सोळा । मिठी घालूं श्यामगळां ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या । माळ घाली विश्वमान्या ।।४।।

चिंतन :-
डोळ्यांनी गोपाळाला पाहिले हीच खरी सुवर्णवेला आहे.
कोटचावधि जन्माते केलेले सर्व पुण्य आज फळाला आले.
आपण बारा सोळा सख्या मिळून शामसुंदराला मिठी मारू.
मी ज्ञानेश्वरांची कन्या, विश्व ज्याला मान देते अशा श्रीकृष्णाला माळ घालते.

२३३ / गोपिकांनो

कासयासी तुम्हां एवढी लगट । कोठिली ते वाट लक्षितसां ।।१।।
वेदश्रुति जाती मिळाया निर्गुणी । तेवी सर्वजणी चालतसा ।।२।।
मुरलीनादाने वेडे केले मना । जातोचि मोहना मिळो बाई ।।३।।
तुमच्या मी येते पाहूनी पाउला । तेणे मसी बोला साजणीनो ।।४।।
काला करी हरी ऐकिले हे कानी । म्हणोनियां वनी जाता काय ।।५।।
तुमच्या उच्छिष्टे पावन होईन । सर्वांग वाहीन प्रियकरा ।।६।।
ज्ञानेश्वर चंद्र तुम्हीही चांदणी । मज उजेडानी येवो द्यावे ।।७।।

चिंतन :-
हे गोपींनो, तुम्ही कोणाशी येवढी जवळीक करीत आहां?
कोणाच्या वाटेकडे तुमचे सारे लक्ष लागले आहे?
वेदातील श्रुती निर्गुण ब्रह्माकडे सर्वांना नेतात आणि स्वतःही तेथेच जातात.
तशातुम्ही सर्वजणी एका कोणत्या ठिकाणी चालल्या आहात, सांगा बरे.
गोपी म्हणतात - आम्हाला मुरलीनादाने वेडे केले आहे. त्या मनमोहनाला भेटायला नव्हे तर त्याच्याशी एकरूप होण्याला आम्ही जात आहोत.
ज्ञानेश्वरकन्या गोपींना म्हणते, तुमच्या पाऊलचखुणा पाहून मीही तुमच्या मागोमाग येते - हे सख्यांनो मलाही यमुनातीरावरील काही सांगा ना!
वनात हरी गोपाल काला करतो हे कानानी मी ऐकले आहे. त्यासाठीच वनांत जात

आहात काय?

तुमचा उच्छिष्ट काला खाऊन मी पवित्र होईन आणि आपल्या सर्वांगाने प्रियकराला सुखी करीन.

ज्ञानेश्वर हे चंद्र आहेत आणि तुम्ही चांदण्या आहात. तुमच्या प्रकाशात मलाही वनात काल्यासाठी घेऊन चला.

२३४

आजचिपासोनी नियम या मना । राधिकारमणा न विसंबे ।।१।।
मागिले संचित आघवेचि वाय । आठविता पाय एक वेळा ।।२।।
प्राप्त ते अपाय सांडीन भोगोनी । राहीन भजनी अनुक्षण ।।३।।
पुढे केलियाचा न लावी संपर्क । ज्ञानेश्वरी एक होवोनियां ।।४।।

चिंतन :-

आजपासून राधिकारमणाला क्षणभर विसरणार नाही हा नियम मनाला लावते.

मागील अनंत जन्मात केलेले संचित कर्म सर्व एकवेळा जरी प्रेमाने भगवंताचे स्मरण केले तरी नाहीसे होऊन जाते.

प्रारब्धाने येणारी दुःखे भोगून टाकीन. पण क्षणोक्षणी भजन करीत राहीन.

ज्ञानदेवांचे ठिकाणी एकरूप झाल्याने पुढे होणाऱ्या क्रियमाण कर्मांचा माझेशी संबंधच राहिला नाही.

२३५

जरी तुज मना चाड नारायणी । तों गोपीचरणी घाली मिठी ।।१।।
आत्मरूप गोपी मनोरूप हरी । अनुभवे करी साम्यभाव ।।२।।
आपण मीनल्या गोपीपादाम्बुजा । मग नंदात्मजा पावणेचि ।।३।।
ज्ञानेश्वरस्वामी हृदयप्रदीप । वाढवी संकल्प हाचि सदा ।।४।।
ज्ञानेश्वरकन्या । माळ घाली विश्वमान्या ।।४।।

चिंतन :-

हे मना, जर तुला नारायणाची आवड असेल तर गोपींची सेवा करून त्यांची कृपा संपादन कर.

स्वतःच्या आत्मरूपाला गोपीरूप कर. मनाला हरीरूप कर.

हा अनुभव घेऊन भगवंताशी साम्यभाव कर.

आपण गोपीचरणांना मिठी मारली तर मग श्रीकृष्णापर्यंत जाऊन मिळणारच.

हे हृदयातील तेजस्वी दीप असलेल्या ज्ञानेश्वर स्वामी, माझा हा संकल्प वाढू द्या.

एकदेशीय कृष्णाचा अनुभव व्यापक असल्याचा प्रत्यय सर्व जगाला येउ द्या.
अशी ही ज्ञानेश्वराची कन्या सर्व विश्वाला वंदनीयअसलेल्या गोपीनाथांना पुस्पमाला घालते.

२३६

विनविते प्रिया मुखी घ्या तांबूल । गुणी अळुमाळ त्रयोदश ।।१(९उ.४७)
वदन मी माझे करी पीकदाणी । उच्छिष्ट सेवनी अनुरक्ता ।।२।।
नीचवृत्तिकाम वाटते भूषण । नेघे लज्जा मन अणुमात्र ।।३।।
ज्ञानेश्वर स्वामी सोडा अनमान । मधुर वचन प्रसाद द्या ।।४।।

चिंतन :-
हे प्रियकरा तुमची प्रिया विनविते ... त्रयोदयगुणांनी युक्त असलेला विडा मुखात घ्या.
माझे मुख तुमची पीकदाणी करा.
कारण मला तुमच्या उच्छिष्ट प्रसादाची ओढ लागली आहे.
तुमचे कोणतेही निकृष्ट काम करणे मला भूषणच आहे. त्यात मला अणुमात्रही लाज नाही.
ज्ञानेश्वरस्वामी काही अनमान करू नका.
तुमची मधुर वचने हाच मला प्रसाद आहे, तो लवकर द्या.

२३७ / कुळगोत

कुळगोत माझे आळंदीचा राणा । आणिक प्रमाणा नेणते मी ।।१।।
तूं माझी माउली तूं माझी बहीणी । तूं बाप तूं धनी प्रिय कांत ।।२।।
तूंचि माझा भोग तूंचि माझा योग । तूंचि शीणभाग विचारिता ।।३।।
तूं माझे सर्वस्व स्वामी ज्ञानेश्वरा । बुडवा वा तारा निजसत्ता ।।४।।

अर्थ :-
मी कोण आहे ते सांगते - माझे कुळ गोत्र सर्वकाही आळंदीचा राणा आहे.
याच्या सत्यतेविषयी दुसरे कोणत्याहि प्रमाणांची मला गरज नाही.
तूच माझी आई आहेस, तूच बहिण आहेस. तूच पिता, स्वामी आणि प्रिय पतीही तूंच आहेस.
माझा योग आणि भोग दोन्ही तूंच आहेस.
मी थकल्यानंतर- तुला थकवा आला काय? म्हणून प्रेमाने विचारणारा तूंच आहे.
स्वामी ज्ञानेश्वरा तुम्ही माझे सार सर्वस्व आहात.
तुम्ही आपल्या शक्तीने मला संसारातून तारा किंवा बुडवून टाका.

२३८

त्रयोदशगुणी । विडा केला चक्रपाणी ।।१।।
प्रेमभरे नारायणा । अंगिकारा कृपाघना ।।२।।
विद्ये-अविद्येचे पाश । वृथा निवटिली आस ।।३।।
भक्तिभावे तृप्त देव । ब्रह्मरूप मोक्ष भव ।।४।।
स्वामी ज्ञानेश्वर माझा । आकारला विश्वकाजा ।।५।।

चिंतन :-

त्रयोदश पदार्थांचा विडा केला आहे. त्याचा प्रेमाने स्वीकार करा.
विद्या आणि अविद्या हे दोन्हीहि बंधच आहेत.
प्रयत्न करून विषयांची ओढ संपविली खरी, पण त्यात काहीच अर्थ नाही.
भक्तिभावाने सर्व विषय भगवंताला दिले तर देव तृप्त होतो आणि मोक्ष व संसार दोन्हीहि ब्रह्मरूप भासतात.
माझे स्वामी ज्ञानदेव विश्वाच्या कल्याणासाठी साकार झाले आहेत.

२३९

आदिनाथ गुरू सकळ सिद्धांचा । तया साचा माझा दंडवत ।।१।।
उमेसी बोधिले हृदयीचे ज्ञान । जाहले तेथून संप्रदाय ।।२।।
मत्स्योदरी तेचि ऐकिले मत्स्येंद्रे । बोध भराभरे भरूनिया ।।३।।
तेचि जे गोरक्षा लाधले उत्तम । जाहले सुगम गुरुकृपे ।।४।।
गोरक्षकरूणा गैनीनाथा फळ । निवृत्ति रसाळ गैनीकृपा ।।५।।
निवृत्ति सुफळ ज्ञानेश्वररूपे । सदगुरू साक्षेपे सर्व लोकां ।।६।।

अर्थ :-

सर्व सिद्धांचा आदिनाथ म्हणजे शंकर गुरू आहेत. त्यांना माझा दंडवत असो.
त्यांनी भगवती पार्वतीला हृदयातले गुज म्हणजे ज्ञानाचा बोध केला. तेथून संप्रदाय निर्माण झाले.
माशाच्या पोटात असताना मच्छिंद्रनाथांनी तो बोध भरभरून खूप ऐकला.
तोच पुढे गोरक्षनाथांना मच्छेंद्रनाथांच्या कृपेने सहज मिळाला.
गोरक्षनाथांच्या करुणेने गैनीनाथांना हे संप्रदायधन लाभले.
गैनीनाथांच्या कृपेने निवृत्ति नाथांना ते मिळाले.
निवृत्तिरूपी वृक्ष ज्ञानेश्वरांसारख्या सुमधुर फळाने संपन्न झाला.
आणि शेवटी माझी ज्ञानाई सर्व लोकांना सद्‌गुरू रूपाने मिळाली.

२४०

दिवाळीसी मजा खेळू तुज सवे । चाळे नवेनवे तेही सारे ।।१।।
उत्तमवाईटा तूंचि अधिष्ठान । सत्त्वादिक गुण तुजमाजी ।।२।।
तुझिया आधारे कोण निवारिता । विश्वावरी सत्ता करु आजी ।।३।।
ज्ञानेश्वरा तुम्ही स्विकारिल्यावरी । मग हर हरी पूजितील ।।४।।

**चिंतन :-**

दिवाळीत तुझ्यासोबत नवे नवे खेळ खेळून मजा करू.
हे चांगले की हे वाईट, याचा मला प्रश्नच नाही.
तूच दोहोंनाही अधिष्ठान आहे. सत्वरजतम सर्व गुण तुझे ठिकाणचेच आहेत.
तुझा आधार असला तर आम्हाला कोण अडथळा करणार? सर्व विश्वावर आम्ही आज सत्ता गाजवू.
ज्ञानदेवा तुम्ही जर स्वीकार केला तर मग शंकर विष्णू देखील आमची पूजा करतील.

२४१

विडा त्रयोदशगुणी । मुखी घ्यावा चक्रपाणी ।।१।।
पीकदाणी माझे मुख । तेथे सोडा प्रेमपीक ।।२।।
भेदभाव निवटोनी । मिळा हृदयालिंगनी ।।३।।
भले निजेचे जागणे । ज्ञानेश्वरी सुखा येणे ।।४।।

चिंतन :-

हे चक्रपाणी त्रयोदशगुणी विडा मुखात घ्यावा.
माझे मुख पीकदाणी समजून ओठातील रस त्यात ओतावा.
मी दुसरी कोणीतरी आहे, असा भेदभाव सोडून मला हृदयालिंगन द्या.
निजल्या निजल्या जागणे उत्तम आणि सुखाचे असते, त्याने माझे तात ज्ञानेश्वर महाराज सुखी होतील.

२४२

मन-पवनाची पाडोनीया गाठी । योगी जयासाठी श्रमताती ।।१।।
तो हरी सुलभ गौळिया आंगणी । देई माय लोणी म्हणुनी मागे ।।२।।
पैंजणाचा नाद उठवी मेदिनी । तेणे प्रबोधिनी सुलीनता ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या भाळली गोपाळा । प्रेमपुष्पमाळा गळां घाली ।।४।।

चिंतन :-

मन आणि प्राण ऐक्य करून योगी ज्याचेसाठी श्रम करतात.

तो भगवान् कृष्ण गोवळ्यांच्या आंगणात खेळतो. आई मला लोणी दे असे म्हणतो. जमिनीवर पाय आपटून पैंजणाचा नाद करतो आणि पायातळी लीन असलेल्या पृथ्वीला ब्रह्म बोधात जागृत करतो.

अशा गोपाळावर ज्ञानेश्वरांची कन्या भाळली आणि त्याच्या गळ्यात प्रेमाने पुष्पांची माळा घातली.

२४३

दृढ निष्ठा एक तुझिये चरणी । असता न कोणी काही वांछी ।।१।।
तुझिये नामाचा जिभे जरी छंद । दुग्ध घृत मध मा कोण घे ।।२।।
तव नखाहूनी कुरवंडितां काया । मग केवी माया भुलवील ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या बळकट जीवी । तारी किंवा गोवी गोपीनाथा ।।४।।

चिंतन :-

दृढ निष्ठा जर तुझ्या चरणी असली तर कोण कशाची इच्छा करणार?
तुझ्या नामस्मरणाचा जर जिव्हेला चाळा लागला तर दूध तूप मधाची इच्छा कोण करेल?
तुझ्या नखावरून शरीर ओवाळून टाकले तर माया पुनः मोह पाडूं शकेल काय?
ज्ञानेश्वरकन्या पक्की आहे. आता मला संसारात गोवणे आणि त्यातून बाहेर काढणे तुझेच हाती आहे.

२४४

* आजीचिये दिनी देखिले लोचनी । रिपुविमोचनी गोपीनाथ ।।१।।
आतां नाही नाही भय दाही दिशा । एका जगदीशा आठवीता ।।२।।
निर्भय होवोनी भजावा गोविंद । सर्व सुखकंद स्वामी माझा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या समसाम्यदृष्टि । आटल्या चावटी वासनेच्या ।।४।।

चिंतन :-

आजच्या दिवशी शत्रूंपासून सोडविणाऱ्या गोपीनाथाला डोळ्यांनी पाहिले.
एका जगदीशाला आठवल्यानंतर आता दाही दिशातील भय संपले.
सर्व सुखाचा कंद माझा स्वामी गोविंद त्याला निर्भय होऊन भजा.
ज्ञानेश्वरकन्या सर्वत्र ब्रह्मानुभव असल्याने सर्वांना समान पाहते.
माझ्या सर्व वासना नष्ट झाल्या. त्यांचा चवचालपणा- चंचलपणा संपला.

२४५

सद्भावाचे तुज घालिते भोजन । जेवी आनंदानें नारायणा ।।१।।
युधिष्ठिराघरी उच्छिष्ट काढिता । फार तूं अनंता भागलासी ।।२।।

द्रौपदीचे एक खावोनीया पान । फेडले उसणं तेधवांचि ।।३।।
पांचही प्राणाची उतरीन दृष्टि । प्राणनाथासाठी आपुलीया ।।४।।
ज्ञानेश्वरबाळा विनवीत श्यामा । हृदयी विश्रामा करा स्वामी ।।५।।
(* उत्सवसमयींचे उदगार. माधान)

चिंतन :-

तुला देण्यासाठी माझेजवळ केवळ सद्भाव आहे. त्याचा तूं आनंदाने स्वीकार कर. (जेव)

युधिष्ठिराच्या घरी उष्टे काढून तू फार थकला आहेस.

वनांत द्रौपदीच्या थाळीतून प्रेमानं एक पान खाल्लस आणि दुर्वासऋषींना तृप्त करून त्यांचं उसणं फेडलं.

तू माझा प्राणनाथ आहेस. पंचप्राण ओवाळून तुला झालेली दृष्ट काढून टाकते.

ही ज्ञानेश्वरकन्या शामसुंदराला विनवणी करते की- या, माझ्या हृदयात तुम्ही विश्राम करा.

....

६

**मानस पूजा**

.....

२४६

नमिला गणेश, माउली सारजा । आळंदीच्या राजा दंडवत ।।१।।
सज्जनसंगती नाही काही उणे । मन जे जे म्हणे ते ते पावे ।।२।।
मायबाप माझा आळंदीवल्लभ । पुरवी सुलभ आळ माझी ।।३।।

चिंतन :-

प्रथम नमन गणेशाला, नंतर माता शारदेला.
आळंदीच्या राजांना साष्टांग दंडवत.
संताचे संगतीने कोणतीही उणीव राहत नाही. मनात जे जे येतं ते ते मिळतं.
माझे मातापिता आळंदीचे स्वामी आहेत. माझी इच्छा ते अगदी सहज पूर्ण करतात.

२४७

तुम्ही ऐका रे कान । श्रीगुरुचे माझ्या गुण ।।१।।
तुम्ही पाहा रे लोचन । माझा विषयमोचन ।।२।।
सखे विनविते वाणी । नाम गाई अनुदिनी ।।३।।
ज्ञानेश्वर मेळवाया । कोटि जन्म घाला वायां ।।४।।

चिंतन :-

हे माझ्या कानांनो, माझ्या श्रीगुरूचे गुण तुम्ही ऐका.
नेत्रांनो, मला विषयापासून सोडविणाऱ्याला पहा.
हे वाणी, सखे, मी तुला विनवणी करते की तू सद्‌गुरूचे नाम रोज गात जा.
ज्ञानेश्वरांना मिळविण्यासाठी कोट्यावधि जन्म वाया गेले तरी घालवा.

२४८

वेद मौनावला, योग पांगुळला । तुझिया रुपाला वर्णिताये ।।१।।
कासयासारिखे बोलतांचि नये । अंतर्यामी होय बोल त्याचे ।।२।।
गिंवसावे कोठे, नाही पाठीपोट । व्यापले अचाट सर्वव्यापी ।।३।।
पहावया नुरे वेगळा पाहतां । आळंदीच्या नाथा निर्विकारा ।।४।।

अर्थ :-

भगवंता तुझ्या रूपाचे वर्णन करता येत नाही म्हणून वेदाने मौन धारण केले अन् योग पांगळा झाला.

तो कशासारखा आहे हे बोलताच येत नाही. अन् तो म्हणतो मी अन्तर्यामी आहे.

त्याला शोधावे म्हटले तर त्याला मागे पुढे असे काहीच नाही. तो सर्वव्यापी आणि आणि अचाट आहे.

स्वतःहून वेगळा करून पहावयाचे असेल तर तो वेगळा उरतच नाही.

असा तो निर्विकार आळंदीचा नाथ आहे.

२४९

असो हे निर्गुण, वर्णावे सगुण । तंव ते कठिण तयाहूनी ।।१।।
निर्गुण अकळ सगुण अनंत । झाले गर्वहत शिवादिक ।।२।।
निर्गुण अलिप्त सगुणाचे सारे । कोण्या उपाचारे करुं पूजा ।।३।।
माझे नाही तरी मी म्हणे ह्यायोगे । एक हाता लागे मानस ते ।।४।।
तेचि मी मानस वाहते चरणी । अनेक करुनि उपचार ।।५।।
जैसी तैसी माझी हृदयाची पूजा । आळंदीच्या राजा अंगिकारा ।।६।।

चिंतन :-

निर्गुण परब्रह्माचे वर्णन करणे कठिण आहे म्हणून सगुण साकार श्रीहरीच्या लीला वर्णन कराव्यात.

निर्गुण हे कळण्याच्या पलिकडे आहे.

सगुण जे आहे ते अनंत आहे.

म्हणून भगवान शंकर देखिल सगुणाचे वर्णन करता करता शिणून गेले.

आणि त्यांचा हरिलीला वर्णन करण्याचा अभिमान गळून गेला.

निर्गुण हे सर्वापासून अलिप्त आहे आणि सगुणाची सर्व सृष्टी आहे.

माझे काहीच नाही त्यामुळे मी श्रीकृष्णाची पूजा कोणत्या साहित्याने करणार?

पूजा करण्याचे उपचार माझे नसले तरी मन मात्र माझे आहे.

ते माझे मानस भगवंताचे चरणी मी वाहते.
आणि मनानेच अनेक उपचार निर्माण करून पूजा करते.
हे आळंदीच्या राजा मी केलेली ही हृदयाची पूजा स्वीकार करा.

२५०

सद्वस्तूचे सत्त्व माझा स्वामिनाथ । अहंता-सत्त्वस्थ पूजिला मी ।।१।।
इदंता सत्त्वाचे वाहूं उपचार । खेळू विश्वभर भक्तिखेळे ।२।।
अनादि काळाचा भेटला खेळिया । ब्रह्म हा भोळिया प्रतिपाळी ।।३।।
ज्ञानेश्वरस्वामी पूज्य भगवंत । तेणे भाग्यवंत आम्ही सदा ।।४।।

चिंतन :-
सद्वस्तू म्हणजे परब्रह्म.
त्याचेही सत्त्व आहेत माझे स्वामी ज्ञानदेव.
अहंतेचेही साक्षी असलेले ते शुद्ध सत्व आहेत.
अहं आणि मम इदं- म्हणजे अहंता आणि ममता.
यातील अहंतेलाही साक्षी असणारे माझे गुरुदेव!
त्यांना जगातील सर्व वस्तू म्हणजे - आपली सारी ममता अर्पण करू.
आणि साऱ्या विश्वात भक्तिभाव ओसंडून जाईल असा खेळ गोकुळातील खेळियासह खेळत राहू.
हा अनादि काळाचा खेळिया सर्वांना खेळवित असतो.
हाच शुद्ध परब्रह्म आहे.
हाच भक्तिभावाने संपन्न असलेल्या भोळ्या भाविकांचे पालन करणारा आहे.
त्याचेच रूप माझे ज्ञानेश्वर स्वामी आहेत.
तेच पूज्य आहेत.
साक्षात भगवान् तेच आहेत.
अन् त्यांच्या ओढीने आम्हीही परम भाग्यवंत झालो आहोत.
श्री ज्ञानदेवाय नमो नमः . . . .!!!

२५१ / प्राणायाम

पदार्थांची नांवे घेवोनियां वाणी । त्यांचे सत्त्व मनी आकर्षिले ।।१।।
कंठ सदगदित स्तब्ध झाला श्वास । केवळ निःशेष कुंभक हा ।।२।।
रेचक पूरक सोडोनि सोपान । प्रेमबळे प्राण संयमिला ।।३।।

शतवर्षे योगी श्रमी जयासाठी । ते भूमि गोमटी जिंकिली हो ।।४।।
नाम आठविता फुलले कमळ । झाले ऊर्ध्वदळ विकासित ।।५।।
अनाहतचक्री उभी मी राहोनी । करी विनवणी प्रियकरा ।।६।।
आळंदीवल्लभ भोळ्याचा अंकिला । बाहे मी तयाला खेळावया ।।७।। (९पू.५०)

चिंतन :-

मानसपूजेत सर्व पदार्थांची नावे स्मरून मी त्यांचे सत्व मनात आकर्षण केले.
त्याने कंठ सद्‌गदित झाला.
श्वास थांबला.
केवलकुंभक साधला.
रेचक पूरक करून कुंभक साधायचा, हा मार्ग सोडला.
केवळ प्रेमाच्या बळाने प्राणाचे संयमन केले.
योगी शंभर शंभर वर्षे श्रम करतात ती भूमिका मी केवळ प्रेमाने जिंकली.
नाम आठवल्याबरोबर हृदयाचे कमळ विकसित झाले. अधोमुखी असलेले ते कमळ उर्ध्व मुख झाले.
वेद ऐकू येतात त्या अनाहतचक्रावर मी पोहोचले.
तेथून माझ्या परमप्रिय गोपीरमण श्रीकृष्णाला मी विनवणी केली.
असा हा कृष्णरूपाने असलेला आळंदीवल्लभ भोळ्यांच्या अंकित असतो. त्याला मी खेळ खेळण्यासाठी हांक मारीत आहे.

२५२

बहुता दिसांची पडलिये तुटी । अवचित भेटी देई स्वामी ।।१।।
विसरले दिशा, आंधळे लोचनी । उपाय मोचनी नेणे काही ।।२।।
टपले षडरि भ्रष्ट करावया । धरुनिया पाया आसडिती ।।३।।
आळंदीवल्लभा तुजवीण आजी । कोण लाज माझी सांभाळिता ।।४।।

चिंतन :-

तुमची माझी पुष्कळ दिवसांची ताटातूट झाली आहे. आता एकदम भेट द्या बरे.
डोळे आंधळे असल्यामुळे दिशा विसरून गेले आहे. सुटण्याची दिशा, मार्ग वगैरे काहीच माहीत नाही.
कामक्रोधादि सहा शत्रू मल या मार्गातून भ्रष्ट करायला टपले आहेत.
पाय धरून ते ओढतात.
हे आळंदीवल्लभा आज तुझ्याशिवाय माझी लाज कोण सांभाळील!

२५३

माध्यान-रजनी जाऊं कोण्या वाटे । चहूंकडे काटे पसरले ।।१।।
गेली कोण्या कामा मज निजवोनी । स्नेहाळे जननी आळंदीशे ।।२।।
पाजी प्रेमपान्हा साहवेना भूक । रडोनिया मुख सुकले की ।।३।।
ज्ञानाबाई तुवां उपेक्षितां पुढे । पाहूं कोणाकडे जगदंबे ।।४।।
तूं माझी जननी तूं माझी बहीण । तूंचि माझा प्राण ज्ञानाबाई ।।५।।
तूं माझा जनक तूंचि माझा सखा । नेणे मी आणिका तुजवीण ।।६।।
तूंचि माझा गुरू तूंचि माझा पति । स्वामी कृपामूर्ति आळंदीशा ।।७।।

चिंतन :-

मध्यरात्र झालेली आहे. कोणत्या वाटेने मी जाऊ? चहूंकडे कांटे पसरले आहेत.
स्नेहाळे आळंदीवासिनी आई मला निजवून तूं कोणत्या कामाला गेली आहेस? सांग बरे !
मला भूक सहन होत नाही, लवकर प्रेम पान्हा पाज. रडून रडून माझे मुख सुकून गेले आहे. हे ज्ञानाबाई पुढे तूच उपेक्षा केलीस तर मी कोणाकडे पाहू बरे !
तू माझी जननी, बहिण, आणि प्राणही तूंच आहेस.
तूंच माझा पिता आहेस, तूंच माझा मित्र आहेस. तुझ्याशिवाय आणखी कोणाला मी जाणत नाही. तूच माझा गुरू आहेस आणि पतीहि तूंच आहेस. स्वामी आळंदीशा तूंच कृपामूर्ती आहेस.

२५४

खेळावयासाठी जरी बाळ रडे । तरी करी पुढे स्तन माय ।।१।।
आपुलीया काजा विनविणे माझे । उचितही तुझे तुज वाटे ।।२।।
माझी तुज चिंता आहे सर्वकाळ । मग मी कोल्हाळ करु नये ।।३।।
परी बाळभावे न रहावे आई । सखे ज्ञानाबाई आळंदीशे ।।४।।

चिंतन :-

खेळण्यासाठी जरी लेकरूं रडले तरी आई त्याला स्तन्य पाजते.
मी जरी माझ्या कामासाठी जरी तुला विनविले तरी उचित काय आहे हे तुझे तुलाच कळते.
सर्वकाळ जर तुला माझी चिंता आहे तरमग मी मला हे पाहिजे ते पाहिजे असा गोंधळ कशाला करू? परंतु **सखे ज्ञानाबाई आळंदीशे** मी तुझे बाळ असल्यामुळे तुला राहवत नाही.

२५५...अ

भय वाटे अंग कांपे थराथरा । झणी ज्ञानवारा लागे मज ।।१।।
कळो लागलिया होईल उपेक्षा । अखंड परीक्षा काळ उभा ।।२।।
नाही भेटणार पुसावया डोळे । रडता मोकळे जन्मभरी ।।३।।
म्हणोनिया माये ज्ञान डावलोनी । तुझी विनवणी करी सदा ।।४।।
आलीस ऐकुनी दीनाची करूणा । बैसलीस आसना हृत्कमळी ।।५।।
लाज वाटे तुझी आरंभिता पूजा । तूं आळंदिराजा दुर्बळ मी ।।६।।

चिंतन :-

मला ज्ञानाचा वारा लागून माझ्या हृदयातील प्रेमाची ज्योत विझेल की काय या भयाने अंग थरथरा कांपत आहे.

मूल मोठं झालं की आई तेवढे लक्ष देत नाही. तसेच मला कळायला लागले म्हणजे माझी उपेक्षा होईल,

म्हणून सध्या अखंड परीक्षाच जणु चालू आहे.

मला भक्षण करायला काळ वाट पहात आहे. जर चुकलो तर जन्मभर मोकळ्या गळ्याने रडलो तरी कोणी डोळे पुसायला येणार नाही.

म्हणून हे आई ज्ञानाला डालवून मी तुझी प्रेमभरे विनंती करीत आहे.

माझी दीन करूणा ऐकून तू आलीस आणि माझ्या हृदयातील कमळावर विराजमान झालीस.

पण आता मात्र संभ्रम उत्पन्न झाला आहे.-

तुझी पूजा मी कशी आरंभ करू?

कारण मी आहे दुबळी आणि तू आहेस आळंदीचा राजा !

२५६---आ

सुकुमारा देऊ कोणते आसन । हृदय कठीण भौतिक हे ।।१।।
निर्मळासी घालूं स्नान कोणे रीति । संपन्ना संपत्ति अर्पू काय ।।२।।
क्षीरब्धिदातिया कोण उपहारु । नमन के करुं व्यापकाते ।।३।।
जाणुनी न राहे वेडे हे मानस । पुरवावी आस कळे तैसी ।।४।।
ज्ञानेश्वर माये मज खेळवाया । मजसम व्हावा समर्थ तूं ।।५।।

चिंतन :-

माझे हृदय हे भौतिक जड आहे आणि तुला सुकुमाराला कोणते आसन देऊ?

आधीच तूं निर्मळ आहेस, तुला कोणत्या रीतीने स्नान घालू?

तूं संपन्न आहेस, कोणती संपत्ती मी तुला देऊ?
जो दुधाचा सागर उपमन्यूला दान देतो, त्याला मी उपहार काय देणार?
हे सर्व समजूनही माझे वेड्या मनाला राहवत नाही. म्हणून
देवा, तू माझी आसवांनी भिजलेली रडवेली मागणी तुला योग्य वाटेल तशी पूर्ण कर.
हे ज्ञानेश्वरमाऊली मला खेळविण्यासाठी तू माझ्यासारखीच लहान हो.
कारण तू तसे करण्यासही समर्थ आहेस.

२५७

जो जो भाव धरी उल्हासे अंतर । तो तो उपचार पुढे होय ।।१।।
तो तो माय माझी प्रेमे अंगिकारी । न दे घडिभरी श्रम माते ।।२।।
म्हणोनिया आजी होवोनि निर्भय । ज्ञानेश्वरपाय पूजिताहे ।।३।।

चिंतन :-
जो जो भाव मी तुझेबद्दल मनात येतो, त्या त्या प्रमाणे उल्हास वाढतो. आणि भावनेप्रमाणे उपचार घडतो.
त्या त्या भावनुरूप माझी ज्ञानेश्वर आई मला प्रेमाने अंगिकार करते.
यत्किंचितहि श्रम होऊ देत नाही. म्हणून मी आज अगदी निर्भय होऊन ज्ञानेश्वरांचे पाय पूजिते.

२५८

मानसपूजेचे प्रथम आन्हिक । प्रार्थना सम्यक केली येथ ।।१।।
येथील नेणता पुढे नाही गति । होईल फजीती आनोपाये ।।२।।
जिंकुनीया मना करावी प्रार्थना । पुजावे चरणा तेव्हा मग ।।३।।
पुढे पादसेवा माहात्म्यवर्णन । ऐकताचि मन ब्रह्म होय ।।४।।
ज्ञानेश्वरकृपे ज्ञानेश्वर गाऊं । तेणे सदा राहूं ब्रह्मानंदी ।।५।।

.....

चिंतन:-
मानसपुजेची पाहिली तयारी म्हणजे प्रार्थना. तीच येथे मी करीतो.
हे जर जाणले नाही तर पुढे मानसपुजेत गति कशी होणार? दुसरा उपाय केला तर फक्त फजितीच होईल.
मनाला जिंकून मग प्रार्थना करावी. आणि नंतर चरणांचे पूजन करावे.
पुढे पायांची सेवा करून महात्म्य वर्णन ऐकावे म्हणजे मनच ब्रह्मरूप होऊन जाते.

ज्ञानेश्वरांच्या कृपेनेच ज्ञानेश्वरांचे स्मरण करू आणि नेहमी ब्रह्मानंदात निमग्न राहू.

(मानसपूजा समाप्त)

.....

२५९

विडा घ्यावा शारंगपाणी । मान द्यावा विनवणी ।।१।।
मुख माझे पिकदाणी । पीक सोडा न लाजोनी ।।२।।
अविद्येची कार्यतनू । येथे काजा येवो अणू ।।३।।
ज्ञानेश्वरा मायबापा । करा येवढी ही कृपा ।।४।।

चिंतन :-

मी विनवणी करते तिला मान देऊन हे शाङर्गपाणी विडा घ्या.

माझे मुख ही पीकदाणी आहे. खुशाल विडा खाऊन माझे मुखात तुमचे मुखातील पानरस द्यावा. माझा देह अविद्येने निर्माण झाला आहे. तो किंचितसा कां होईना कामाला येऊ द्या. ज्ञानेश्वरा मायबापा माझेवर येवढी कृपा करा.

२६०

आजीचिये दिनी । घरा आले मोक्षदानी ।।१।।
सवे राई-रूखमाबाई । संतमेळा लवलाही ।।२।।
सुखाचे सकळ । देखिल्या पदकमळ ।।३।।
म्हणे ज्ञानेश्वरबाळा । भाग्ये लाधले गोपाळा ।।४।।

चिंतन :-

आज मोक्ष देणारे भगवान् स्वतः घरी आलेत.

त्यांचे सोबत राई आणि रुक्मिणी दोघी असून सोबत संतमंडळीही आहेत.

त्यांची सर्व सुख देणारी कमळासारखी पाऊले पाहून ज्ञानेश्वरकन्या म्हणते - माझ्या महद्भाग्याने मला भगवान कृष्णाचा लाभ झाला.

२६१ / श्रीमहाराजांचा मंत्र

आदि-मध्य-अंती हा आधार एक । अक्षरे तारक चार मज ।।१।।
आणिकांचे मंत्र जाहले ठेंगणे । बांधले त्रिगुणे सिद्धादिकी ।।२।।
मंत्र मंत्रदाता मज दोन्ही एक । आन उपासक द्वैतबद्ध ।।३।।

ज्ञानदेव नाम ज्ञानदेव रूप । वेगळा संकल्प नाही नाही ।।४।।

चिंतन :-

जगाच्या आधी मध्य आणि अंती, ज्ञानेश्वर ही चार अक्षरेच तारणारी आहेत.

त्यांचाच एक मला आधार आहे.

आणिक बाकीच्यांचे मंत्र सिद्ध अरि वगैरे अडचणींनी आणि सत्व,रज,तम यांनी बांधलेले आहेत. म्हणून ते माझ्या मंत्रासारखे उत्कृष्ट नाहीत.

मला मंत्र आणि मंत्र देणारे गुरू एकच आहेत.

बाकीचे जे उपासक आहेत ते सारे द्वैताने बद्ध आहेत म्हणजे उपास्य आणि गुरू वेगळे वेगळे आहेत.

माझ्या मनात ज्ञानदेवांचे नाम आणि ज्ञानदेवाचे रूप हेच भरून गेले आहे. याशिवाय मनामध्ये दुसरी कल्पनाच येत नाही.

२६२ / आळंदी राहवे

सोडोनी सकळ आळंदी राहावे । वाटे श्वान व्हावे समर्थाचे ।।१।।
उष्ट्या पत्रावळी वेचुनिया शीत । खावे आनंदित होवोनिया ।।२।।
कराव्या नगरी भावे प्रदक्षिणा । ऐकू यावा कानां नामघोष ।।३।।
ज्ञानेश्वर स्वामी एवढीच आस । पुरवा निःशेष दीनबंधु ।।४।।

चिंतन :-

सकळ संसार सोडून देऊन आळंदीला श्वान होऊन राहावे.

संतांच्या उष्टया पत्रावळीतून शीते वेचावीत आणि आनंदाने खावीत.

आळंदीला नगर प्रदक्षिणा करीत राहाव्या.

कानावर नित्य नामघोष पडत राहावा.

अहो ज्ञानेश्वरस्वामी माझी एवढी आशा निःशेष पूर्ण करा हीच मागणी !

२६३

* आज माझा कां हो स्फुरे सव्य बाहू । कोण धर्मभाऊ प्रगटतो ।।१।।
आयकिले होते सदगुरूवदनी । व्रजी चक्रपाणी अवतरेल ।।२।।
आम्ही मुनि रागद्वेषविवर्जित । व्रजाकडे चित्त धावते कां ।।३।।
राम-अवतारी दिधले वचन । इच्छा पुरवीन कृष्णजन्मी ।।४।।
तोचि की समय आलासे समीप । ज्ञानेश्वरबाप कृपावंत ।।५।।

***चिंतन :-***

*आज माझा उजवा बाहू स्फुरण पावतो आहे. कोण बरे धर्मबंधू भेटणार?*
*सद्‌गुरूंच्या मुखातून ऐकले होते की वृंदावनांत भगवान् कृष्ण प्रकट होणार आहे.*
*आम्ही मुनी आहोत - रागद्वेषविवर्जित आहोत, तरीही व्रजाकडे चित्त कां बरे धावते?*
*बरोबर आहे -*
*रामजन्मात रामाने वचन दिले होते की कृष्णावतारात तुमची इच्छा पूर्ण करेन म्हणून.*
*तोच पवित्र काळ आला की काय? आमचे ज्ञानेश्वर तात कृपावंत आहेत.*

२६४

*विडे त्रयोदशगुणी । तुम्ही घ्या हो चक्रपाणी ।।१।।*
*तुज पूजिती भाविक । मज गुण नाही एक ।।२।।*
*आपुलेचि म्हणोनियां । सांभाळावे व्रजराया ।।३।।*
*स्वामी आळंदीवल्लभा । चिदानंदपूर्ण गाभा ।।४।।*

*चिंतन :-*

*तेरा गुणांनी युक्त असलेले विडे हे चक्रपाणी तुम्ही घ्या.*
*सर्व भाविकजन तुला पूजितात. माझेजवळ मात्र एकही चांगला गुण नाही की ज्याने मी तुम्हाला सुखी करूं शकेन.*
*परंतु मला एकदा आपला म्हणा आणि हे व्रजराया माझा सांभाळ करा.*
*हे श्रीकृष्णा तुम्हीच माझे स्वामी आळंदीचे वल्लभ आहात. तुम्ही ज्ञान आणि आनंदाचा गाभा आहात. आपण मला आपले म्हणा.*

२६५

*बैसुनिया सिंहासनी । बहु श्रमलाती मनी ।।१।।*
*आता शिबिके बैसावे । लोकत्रय आक्रमावे ।।२।।*
*पाठवाल तेथे नेऊ । आम्ही प्रेमे स्कंधी घेऊ ।।३।।*
*ज्ञानेश्वरा दीनानाथा । प्रार्थू पायी ठेवुनी माथा ।।४।।*

*चिंतन :-*

*आळंदीला एकाच सिंहासनावर बसून कंटाळा येऊन श्रमला असाल.*
*आता पालखीत बसावे आणि त्रैलोक्यात संचार करावा.*
*आम्हाला तुम्ही जेथे पाठवाल तेथे आणि तुम्हालाही खांद्यावर घेऊन जाऊ.*
*ज्ञानेश्वरा दीनांच्या नाथा, तुमच्या पायांवर मस्तक ठेवून प्रार्थना करते.*

A

२६६

* सर्वत्री आलेत आक्रमूनी आता । सिंहासनी ताता चला स्वामी ।।१।।
वियोगी पडले माझे हे हृदय । अक्षय हे पाय तेथे ठेवा ।।२।।
प्रेममंदिर हे करा शोभावंत । स्वामी कृपावंत होवोनिया ।।३।।
ज्ञानेश्वरप्रभु दीन मायबापा । ऐक्यभाव सोपा जीवब्रह्मी ।।४।।

चिंतन :-

हे ताता, आता आपण त्रैलोक्यात फिरून आलात.

आपण सिंहासनावर विराजमान व्हा.

तुम्ही बाहेर गेल्यामुळे माझे हृदय वियोगात सांपडले आहे. तुमची अक्षय पाउले माझे हृदयात ठेवा पाहू.

स्वामी आपण कृपावंत होऊन हृदयात पाऊले ठेवून ते शोभायमान करा.

हे ज्ञानेश्वरप्रभो, आपण दीनांचे आईबाप आहात आपण कनवाळू होऊन जीव आणि ब्रह्माचे ऐक्य चटकन करा.

तुमचेमुळे जीवब्रह्म ऐक्य सहज सोपे होते.

२६७ / पंढरी चला

(आधपद)

एकवेळ पंढरी पाहूं चला । प्रेमे क्षेम देऊ विठ्ठला ।।१।।
मेळीं संतांचे प्रेम गळे । करिती गोविंदघोष मेळे ।।२।।
पुंडरीक मुकुटमणि । बिंदुस्थळ मूर्तिस्मरणी ।।३।।
जे का बिंदुस्थ पंढरी । समाधि ते अलकापुरी ।।४।।
देऊनिया विठ्ठलकर । बैसविले ज्ञानेश्वर ।।५।।

चिंतन :-

एकवेळा तरी पंढरी पाहण्याला आपण जाऊ. प्रेमाने विठ्ठलाला भेटू.

संतांच्या मीलनामध्ये प्रेमरसाचा वर्षाव होत असतो.

ते सर्व संत मिळून गोविंद नामाचा घोष करीत असतात.

भक्तपुंडरीक संताचे मुकुटमणी आहेत. अन् त्या मुकुटाचा मुख्य बिंदु म्हणजे विठ्ठल मूर्तीचे स्मरण करणे होय.

पंढरपुरामध्ये मुख्य बिंदू म्हणून जे आहे तेच आळंदीला समाधिस्थळ आहे.

विठ्ठलांनी आपल्या तळहातावर ज्ञानदेवांना बसविले आणि संजीवन समाधीत विराजमान केले.

२६८

अनंत पद्धति तुझिया भक्तीच्या । कोण ती आमुच्या उपयोगी ।।१।।
जाता तेणे मार्गे न चलेचि जीव । पाहिजे की ठेव त्वत्कृपेची ।।२।।
म्हणोनिया एका तुज आठवीन । आणिकां सोडीन साधनांते ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या धरोनि चरण । जनन मरण भय सांडी ।।४।।

**चिंतन :-**

तुझी भक्ती करण्याच्या अनंत पद्धती आहेत पण आमच्या उपयोगी कोणतीच नाही.
त्या योगमार्गाने स्वतंत्रपणे जातो म्हटले तर जीवाची प्रगती होतच नाही कारण तुझ्या कृपेचा ठेवा सोबत हवा असतो.
म्हणून मी फक्त तुला सतत आठवीन. हेच एक साधन करीन आणि इतर सर्व साधने सोडून देईन.
ज्ञानेश्वरकन्येने याप्रमाणे तुझे चरण घट्ट धरले असून त्या भरंवशावर जन्म आणि मरणाची भीती सोडून दिली आहे.

२६९

संदेहे का मरुं । भरंवसा कां न धरुं ।।१।।
जरी संदेही मानस । तरी बुद्धीते विश्वास ।।२।।
अविश्वास क्षणभरी । कोटी नरकसम परी ।।३।।
हठे ठेवीन विश्वास । ओळखोनि निश्चयास ।।४।।
मनबुद्धीचे भांडण । जरी जन्मभरी पूर्ण ।।५।।
वाढवीन हठ । संशय करुन अव्हाट ।।६।।
आळंदीजीवना । नाममय द्या जीवना ।।७।।

चिंतन :-

परमार्थमार्गावर संशय करून मरू कशाला? त्यापेक्षा ज्ञानेश्वरांच्या नामस्मरणावर विश्वास कां ठेवूं नये.
मनाला जरी संशय असला तरी माझ्या बुद्धीला विश्वास आहे ना.
क्षणभर जरी अविश्वास ठेवला तरी कोटी नरकवासासारखी अवस्था होते.
बुद्धीच्या निश्चयाला ओळखून हट्टाने विश्वास ठेवीन.
मन आणि बुद्धी यांचे जन्मभर भांडण असले तरी मी हेच करीन.
बुद्धीचा हट्ट वाढवीन संशयाला भलतीकडे हाकलून देईन.
स्वामी आळंदीजीवना माझे जीवन नाममय होईल असा आशीर्वाद द्या.

२७० / देव सुंदर सुंदर

देव सुंदर सुंदर । आवडतो निरंतर ।।१।।
देव सज्जन सज्जन । त्याचे पायी जडो मन ।।२।।
देव समर्थ समर्थ । पुरवी दुर्बळांची आर्त ।।३।।
देव आई देव आई । कृपावंत दुजा नाही ।।४।।
देव बाप देव बाप । निवारितो तिन्ही ताप ।।५।।
देव सदगुरू सदगुरू । सखा स्वामी ज्ञानेश्वरु ।।६।।

अर्थ :-

देव इतका सुंदर आहे की तो सारखा आवडतच असतो. आवडीची तृप्ती कधी होतच नसते.

खरा संतसज्जन देवच आहे, त्याचे पायी माझे मन जडो.

देव समर्थ आहे, तो दुर्बळाची आर्त पुरवितो.

देवाशिवाय अधिक कृपावंत कोणीच नाही.

माझा सखा, माझा स्वामी ज्ञानेश्वरच आहेत, तेच माझे सद्‌गुरू आहेत.

२७१ / श्रीगोपालदास महाराज

तुझे नांव नारायणा । लागे गोड माझे मना ।।१।।
त्याने पुरविली पाठ । म्हून१ गुरुसि विपट ।।२।।
तेचि धरी दृढ बापा । शेखी झाली गुरूकृपा ।।३।।
स्वामी आळंदीजीवना । मज पावे नारायणा ।।४।।

(१.पहिले गुरू = श्री गोपालदास महाराज)

२७२ / श्रीगोपालदास महाराज

आज माझा देह जाहला शीतळ । निमाले विकळ चित्त होते ।।१।।
मायबाळा तुटी द्वादश वर्षाची । गुडी ते मनाची फिटली ती ।।२।।
अभय हृदय जाहले सर्वदा । ..... ।।३।।
आळंदीवल्लभे उडविली भीति । गोपालदासोक्ति आश्वासोनी ।।४।।

चिंतन :-

आज माझा देह शीतल शांत झाला.

चित्ताची विकलता गेली.

गोपालदासस्वामींचा आणि माझा १२ वर्षाचा वियोग होतां तो संपला.

मनाची अढी फिटली.

हृदयातील भीती संपूर्ण नाहीशी झाली.
गोपालदासांच्या वचनाते माझे मन आश्वस्त झाले.
हे आळंदीवल्लभे माझे सर्व भय तू नाहीसे केले.

२७३ / श्रीगोपालदासांची संमति

काय सांगू सये सुदिन-महिमा । मिळाले ते आम्हां मनोबळ ।।१।।
दत्तात्रेयमंत्र नावडला जीवा । गोपीनाथ-ठेवा धरियेला ।।२।।
शापभये नाही गेलो भेटावया । मंत्रगुरूराया बारा वर्षे ।।३।।
परी कृष्णनामी धरियेला छंद । साह्य केले शुद्ध ज्ञानदेवे ।।४।।
दिला अनुग्रह घेउनि मांडीवरी । परी मतांतरी भय होते ।।५।।
म्हणोनि स्वामीने बळे केला वेळ । पूर्व गुरूस्थळ दाखवोनी ।।६।।
वदविले त्यांच्या मुखे कृष्ण गावा । सुखे न जपावा दत्तमंत्र ।।७।।
आळंदीवल्लभे तूं माझी माउली । आळी जे घेतली पुरविसी ।।८।।

(१ तातांनी अनुग्रह देण्याचे पूर्वी उतावळीने मी गोपालदास महाराजांचा मंत्र घेतला . त्यांनी दत्तात्रेयाचा मंत्र दिला. तो मला न आवडून, मी त्यांचेकडे दहाबारा वर्षे गेलो नाही. माझी आवडी कृष्णाकडे होती. एके दिवशी ते भेटून मला त्यांनी कृष्णमंत्र जपण्यास सांगितले. त्या वेळेचा हा अभंग आहे. )

चिंतन :-

त्या उत्तम दिवसाचा महिमा मी काय वर्णन करणार!
मला मनोबळ मिळाले.
गोपालदास महाराजांनी दिलेला दत्तात्रेयाचा मंत्र मला आवडला नाही
मी गोपालदास महाराजांना भेटण्यास १२ वर्षे गेलो नाही.
पण कृष्णनामाचा छंद मुळीच सोडला नाही.
यासाठी ज्ञानेश्वरमहाराजांनी मला उत्तम रीतीने साह्य केले.
मला मांडीवर घेऊन अनुग्रह दिला.
पण दुसरे मत स्वीकारण्यामुळे मला भीती वाटत होती.
ही भीती जाण्यासाठी अनुग्रह दिला.
पूर्वीचे गुरुस्थळ दाखविले व सांगितले की तेथे जाऊन यावे.
गुरू गोपालदासांच्या मुखाने तूं कृष्णमंत्र गात जावास, दत्तात्रेयांचा मंत्र सोडून दे काळजी करू नकोस. असे वदविले.
आळंदीवल्लभे तू माझी माउली आहेस.

जी जी मी आळी घेतो ती तू पुरवितेस. मला आणखी काय हवे?

२७४

जैसा तैसा ग्रास । गोड करो श्रीनिवास ।।१।।
मिळोनी गोपाळ । तृप्त होवो सर्वकाळ ।।२।।
न लागोनी दृष्टी । सुखे नांदो स्वामी सृष्टी ।।३।।
उच्छिष्टाचे साठी । ज्ञानेशजा लाळ घोटी ।।४।।

चिंतन :-

मी दिलेला नैवेद्याचा घास भगवंता तू गोड करून घे.
भगवान श्रीकृष्ण गोपाळांसमवेत सर्वकाळ तृप्त होवोत.
कोणा दुष्टाची दीठ न लागता स्वामी सृष्टीवर सुखांने नांदो.
भगवंताच्या उच्छिष्टाकरता ज्ञानेश्वरकन्या आसूसलेली आहे.

२७५

त्रयोदशी गुणी । विडा घ्यावा चक्रपाणी ।।१।।
विसरा मागिले । अपराध जे जे झाले ।।२।।
स्वामी भेटे तुम्हां ऐसा । भाग्य चढे न कां दासा ।।३।।
कासयाची चिंता । स्वीकारिल्या भगवंता ।।४।।
ज्ञानेश्वर माय । मज आंदण दे पाय ।।५।।

चिंतन :-

हे आर्यपुत्र श्रीकृष्णा, तेरा वस्तूंनी तयार केलेला विडा घ्या.
माझेकडून जे जे मागे अपराध घडले ते सारे विसरून जा.
तुमच्यासारखा स्वामी जर भेटला तर दासाचे भाग्य कां बरे वाढणार नाही?
तुम्ही स्वीकारल्यानंतर आता चिंता कशाची?
हे माझे आई ज्ञानेश्वरमाउली तू मला आपुली पाउले आंदण दे म्हणजे झाले.

२७६

* देखिलिया डोळां । जीव निवे एकी हेळा ।।१।।
आघवे संशय । विनिवारी गुरुश्रय ।।२।।
केलियाचे फळ । गोपिका पदकमळ ।।३।।
सोनियाची गळा । ज्ञानेश्वर नाममाळा ।।४।।

चिंतन :-

एकदा जरी कां डोळ्यांनी श्रीगुरूंना पाहिले की जीवाचा संसारताप नाहीसा हा जीव

शांत व शीतल होतो.

मनातले सर्व संशय श्रीगुरूंचा आश्रय केला असतां त्यांच्या सहज बोलण्यातून ते निवारण होतात.

सर्व परमार्थाची साधने केल्यावर फळ कोणते मिळते- तर गोपिकांचे पदकमळ!

माझ्या गळ्यात ज्ञानेश्वरनामरूपी सोन्याची माळ आहे.

हे सर्व देणं तीनं दिलेलं आहे.

२७७

जळो ती आघवी कवित्वाची कळा । नाही घननीळा वर्णिले की ।।१।।
जळो ते वदन किडे पडो वाचे । श्रीवासुदेवाचे स्थान न जे ।।२।।
होवो ते हृदय शतधा विदीर्ण । सांवळे सगुण ज्यात नाही ।।३।।
जळो विद्याभ्यास जळो जगी मान । न ज्या अभिमान वैष्णवांचा ।।४।।
ज्ञानेश्वरकन्या नेणे आनोपाया । आर्यपुत्रपाया वांचुनीयां ।।५।। (९उ.५५)

चिंतन :-

ज्यात घननीळ श्रीकृष्णाची लीला वर्णिलेली नसते ती कवित्वाची कला जळून जावो.

ज्यात वासुदेवाला स्थान नाही ते मुख जळून जावो, जीभेवर किडे पडोत.

ज्यात सगुण सावळे रूपाला स्थान नाही असे हृदय शतधा विदीर्ण होवो.

ज्याला वैष्णवांचा अभिमान नाही, त्याचा विद्याभ्यास जळो, जगात मिळणारा मान मरातब जळो.

आर्यपुत्रा, आपल्या चरणाशिवायाशिवाय परमेश्वरप्राप्तीचा कोणताही उपाय ज्ञानेश्वरकन्या जाणत नाही.

२७८ / अटळ विश्वास

विश्वासाच्या पोटी । येती अनुभव कोटी ।।१।।
काही न लागे आणिक । ध्यानप्रीति पुरे एक ।।२।।
सुख सर्वकाळ । आलिंगनी व्रजपाळ ।
ज्ञानेश्वर तात । करितो विश्वाचे हित ।।४।।

चिंतन :-

विश्वास असला म्हणजे कोट्यावधि अनुभव येत असतात.

त्याला दुसरे काही लागत नाही.

केवळ ध्यान करण्याची ओढ असली म्हणजे झाले.

ध्यानामध्ये कृष्णाला आलिंगन दिले म्हणजे सर्वकाळ भक्त सुखरूप असतो.

हा मार्ग दाखवून ज्ञानेश्वरमहाराज सर्व विश्वाचे हित करीत असतात.

२७९ / काला

गोड करोनियां काला । प्राणनाथा जेऊं घाला ।।१।।
धेनुपाळ बाळ संगे । नाचताती प्रेमरंगे ।।२।।
तृप्त झाल्या आर्यपुत्र । सेवूं उच्छिष्टाचे पात्र ।।३।।
ज्ञानेश्वर स्वामी माझा । अनुकूल सत्समाजा ।।४।।

चिंतन :-

माझ्या प्राणनाथासाठी मधुर रसाने भरलेला काला करा आणि प्रेमाने जेऊ घाला.
गायी पाळणारे गवळी बालकृष्णाच्या सोबतीने प्रेमरंगात मग्न होऊन नृत्य करितात.
माझे पति आर्यपुत्र भगवान कृष्ण जेऊन तृप्त झाले की त्यांचे पात्रातील शिल्लक असलेले उच्छिष्ट मी सेवन करीन.
सद्‌गुणसंपन्न लोकांना माझे स्वामी ज्ञानेश्वर महाराज नेहमी अनुकूल असतात.

२८० / विडा

त्रयोदश गुणी । विडा घ्यावा चक्रपाणि ।।१।।
जोडोनिया कर । विनविते वारंवार ।।२।।
दीन एकटी मी रंका । बैसवावे निज अंका ।।३।।
स्वामी आळंदीच्या राया । कधी सांडू नये माया ।।४।।

चिंतन :-

तेरा उत्तम पदार्थांनी असा विडा हे चक्रपाणी तुम्ही सेवन करा.
हात जोडून मी आपणाला वारंवार विनवीत आहे.
मी एकटी, दीन आणि निष्कांचन आहे. तरीही मला आपल्या मांडीवर घ्याना.
स्वामी आळंदीच्या राया माझ्यावरील तुमचे प्रेम उणे होऊ देऊ नका.
एवढीच विनवणी.

२८१*

तळमळ भेटीसाठी । उतावेळ जीव पोटी ।।१।।
हृदयींचे आकळेना । मनोलालसा सगुणा ।।२।।
नेणे योग सांख्य श्रुति । जीव वांछी पायी प्रीति ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या गातां । जनी अनाहत-गाथा ।।४।।

चिंतन :-

माझा जीव तुझ्या भेटीसाठी उतावीळ होऊन तळमळत आहे.

हृदयात जे निर्गुण आहे त्याचे आकलन होत नाही.
मनाची लालसा तुझ्या सगुण रूपाचीच आहे.
मला वेद सांख्य योगी काही समजत नाही.
मला फक्त तुझ्या पायाची प्रीति दे म्हणजे झाले.
ज्ञानेश्वरांची कन्या गाताना अनाहत नादची दिव्य अनुभूती या मृत्युलोकात येतो.

२८२.

तुजवीण जोडूं कवणासी नाते । जीवेभावे चित्ते मायबापा ।।१।।
शतकोटी गोत शिंपेचे रजत । हृदयींची ज्योत माउली तूं ।।२।।
तूं एक स्नेहाळ जीवीचा जिव्हाळा । पुरविसी लळा वांछू तेवी ।।३।।
आळंदी वल्लभे सखिये साजणी । काळतोंडे जनी आन देव ।।४।।

चिंतन :-
जिवीचे मनापासूनचे नाते हे मायबापा, तुझ्याशिवाय इतर कोणाशी लावूं सांग बरे!
शंभरकोटी नातेवाईक असले तरी ते शिंपेवरील चांदीच्या भासासारखेच भ्रमरूप आहेत.
सर्वांच्या आणि माझ्या हृदयात असलेली चैतन्याची ज्योत तूच आहेस.
तूंच एक माझेवर स्नेह करणारा आहेस.
माझ्या जिवाचा जिव्हाळा आहे.
मी ज्याची इच्छा करतो तो लळा तूं पूर्ण करतोस.
आळंदीवल्लभे तू माझी साजणी सखी आहेस.
आणि इतरांचे इतर देव हे मात्र काळाच्या मुखात भस्म होणारे काळतोंडे आहेत.

२८३

कैसे करुं ध्यान ठावे नाही मज । कोण्या रुपें तुज चित्तीं आणू ।।१।।
नाही मूर्ति आणि नाही चित्ररेखा । वर्णनही देखा न मिळेचि ।।२।।
कृष्णविष्णुमूर्ति करोनियां एक । करीन सुरेख ध्यान तुझे ।।३।।
ज्ञानदेवकांति सांवळी हे वाणी । तुमचीच ध्यानी आणीन की ।।४।।
आळंदीवल्लभ आधीचा निर्गुण । जाहला सगुण मजसाठी ।।५।।
(तातांची प्रतिमा किंवा चित्र सापडले नाही त्याबद्दलचे उदगार.)

चिंतन :-
भावपूर्ण मनाने तुमचे कसे ध्यान करायचे ते मला माहीत नाही.
तुमची मूर्ति नाही आणि रेखाचित्रही नाही आणि कोठे कोणी केलेले वर्णनही मिळत नाही. म्हणून-

कृष्ण आणि विष्णु यांची एकत्र सुरेख मूर्ती करून तुझे सुरेख ध्यान करेन.
ज्ञानेश्वरांची कांति सावळी होती हे तुमचेच वर्णन ध्यानात आणीन.
आळंदीचा वल्लभ हा मूळचा निर्गुण असून भक्तासाठी सगुण झाला आहे.

२८४

हाचि एक भरंवसा । श्रीनिवासा वाटतो ।।१।।
पापी आणि पुण्यवंत । भगवंत चिंतिता ।।२।।
दोघे एका ठाया येती । द्वैतपाती चुकोनी ।।३।।
शतजन्म याचिवरी । सोसूं उरी न खंत ।।४।।
सख्या ज्ञानेश्वरस्वामी । अंतर्यामी जाणता ।।५।।

चिंतन :-
श्रीनिवासा तुझा एकच भरवंसा वाटतो की
तुझे चिंतन केले असता पापी आणि पुण्यवंताला एकच फळ मिळते.
दोघेही एकेच ठिकाणी येतात.
द्वैत दोघांचेही नाहीसे होते.
असे होण्यास केवळ चिंतन करीत शंभर जन्म जरी झाले तरी हृदयात खंत वाटणार नाही.
सख्या ज्ञानदेवा, माझे अंतर्यामी राहून मला जाणणारे तुम्हीच आहात.

२८५

ऐसा जाहलो असुर । जेणे डोले गयासुर ।।१।।
देह मंदाकिनीजळीं । शिर आळंदीदेऊळीं ।।२।।
एक शिर वृंदावनी । एक केदारेश-स्थानी ।।३।।
नियम हा नमस्कारा । प्रीति पावो ज्ञानेश्वरा ।।४।।

चिंतन :-
जयासुराचे धड गयेत, शिर नेपाळात अशी कथा आहे. तिला अनुसरून महाराजांनी नमस्कार केला आहे. गयासुराला देखील आश्चर्य वाटून तो शाबासकी देईल, असा असुर होऊन मी नमस्कार करीत आहे.
मी देह हरिद्वारजवळ मंदाकिनी गंगेजवळ ठेवला.
आणि मस्तक आळंदीच्या मंदिरात टेकविले.
दुसरे शिर वृंदावनात नतमस्तक केले.
तिसरे केदारेश्वर शंकरापुढे नमविले.

असा तीन मस्तकांनी तीन ठिकाणी नमन करून गयसुरावरही मी ताण केली.
अशा नमस्कारामुळे ज्ञानेश्वरांवर माझे प्रेम अर्पण होवो.

२८६ / नैवेद्याचे वेळचा अभंग

आमुचेनि हाते कोण न प्रमाद । निर्विकार शुद्ध तुम्ही देवा ।।१।।
आरोपूनि गुण तुमचिये ठायी । बोलो कांहीबाही अज्ञानाने ।।२।।
सामान्य चैतन्य साहतां विषय । म्हणोनि निर्भय आरोपी मी ।।३।।
दयेसाठी आम्हां वाहो द्यावी फुले । घास चिमुकुले घ्या वदनी ।।४।।
आळंदीवल्लभा तुम्ही तो निर्गुण । आमुचे खेळण पुरवावे ।।५।।

चिंतन :-

देवा तुम्ही निर्विकार आणि शुद्ध आहात उलट आमच्या हाताने कोणता प्रमाद घडत नाही? त्यामुळे आम्ही अशुद्ध आहोत.
तुमचे ठिकाणी गुणांचा आरोप करून आम्ही अज्ञानामुळे तुमचे संबंधी काहीबाही बोलत असतो.
तुम्ही सामान्य चैतन्य असल्याने सर्वच विषय (चांगले वाईट) सहन करता. म्हणून निर्भय होऊन आम्ही तुमचे ठिकाणी विषयांचा आरोप करीत असतो. नानाविषय भोगरचना तुम्हाला अर्पण करतो.
तुम्ही दयागुणाने संपन्न आहात. आम्हाला फुले वाहू द्यावीत आणि आपुल्या चिमुकल्या वदनात चिमुकले घास घ्यावेत.
आळंदीवल्लभा तुम्ही निर्गुण असूनही, आम्हा लहानांचा खेळ स्वीकारून कौतुक करावे, ही विनंती

२८७ / चवथी पत्नी

तुम्हां तीन पत्नी देवा । परी करुं न पवती सेवा ।।१।।
धरणी ते नित्य जड । तिचे उठणे अवघड ।।२।।
लक्ष्मी सर्वदा चंचळ । पाहे सभाग्याचे कूळ ।।३।।
कीर्तिवेश्या सर्वापरी । हिंडे त्रिभुवनावरी ।।४।।
माझी यासाठी विनंती । दासी कीजे ती चवथी ।।५।।
स्वामी आळंदीजीवना । नमो भुवनपावना ।।६।।

चिंतन :-

देवा तुम्हाला तीन पत्नी आहेत पण कोणीही सेवा करू शकत नाहीत.
पृथ्वी तर नेहमीच जड आहे तिला उठणेच अवघड आहे.

लक्ष्मी सर्वदा चंचल असते. ती सारखी सभ्याग्याचे कुळ पाहून तेथे रहात असते.
कीर्ति तर काय जणु वेश्याच आहे. ती सर्व त्रिभुवनात हिंडत असते.
म्हणून तुम्हाला यासाठी विनंती आहे की मला चवथी दासी म्हणून स्वीकारा.
सर्व भुवनाला पावन करणाऱ्या आळंदीजीवना माझा तुम्हाला नमस्कार असो.

२८८

तो एक साजिरा तो एक सोयरा । तोचि मज खरा आवडता ।।१।।
तो एक स्नेहाळू तो एक कृपाळू । करी प्रतिपाळू दासाचा जो ।।२।।
तो एक अनंत तो एक भगवंत । तो एक सिद्धांत निगमांचा ।।३।।
तो एक सदगुरू तो एक सदगुरू । जो आळंदीश्वरु दीनानाथ ।।४।।

चिंतन :-
तोच एक चांगला सोयरा आहे तोच मला खरा आवडणारा आहे.
खरा स्नेह करणारा कृपा करणारा आणि दासांचे प्रेमाने पालन करणारा आहे.
साभाळणारा आहे.
ज्याला अंत नाही तो भगवंन आणि वेदांचा एकमेव सिद्धान्त तोच आहे.
माझे गुरू सद्‌गुरू तेच आहेत आणि ते दीनांचे नाथ आळंदीश्वर आहेत.

२८९

इतुक्या देवांसी करितो नमन । करुनी कवन भेदबुद्धी ।।१।।
तयांचा संतोष तातांच्या स्मरणे । होवो हेचि मने प्रार्थिताहे ।।२।।
मलिन निर्मळ जैसा तैसा राहो । तातनाम गावो वाणी माझी ।।३।।
ज्ञानदेव कृष्ण कैलासवल्लभू । हृदयी स्वयंभू ऐक्ये नांदो ।।४।।

चिंतन :-
अनेक देव आहेत अशी भेदबुद्धी धरून इतक्या देवांना मी नमस्कार करतो आणि कविता करतो.
या सर्व देवांचा संतोष ज्ञानदेवांचे स्मरण करून होवो. हीच मनाने प्रार्थना करतो.
मलीन असो की निर्मळ असो तातांचे नाम माझ्या वाणीने गायन करावे हीच इच्छा आहे. ज्ञानदेव श्रीकृष्ण आणि कैलासपती शंकर यांचे माझ्या हृदयात स्वयंभू ऐक्य नांदो. हीच इच्छा.

२९०

सुलभ ही वाट दाविली सज्जनी । हृदय भजनी गुंतवावे ।।१।।
पुढील सदगुरू शिष्य तो मागिला । वेळो वेळा भला गर्वभंग ।।२।।

मंत्रही निर्माण रामकृष्णहरी । शोधणे सिद्धारि नको काही ।।३।।
जळले पोळले निवताती येथे । विनटल्या कथे श्रीहरीच्या ।।४।।
सोहं हंस जप डोळ्याचे दाबणे । न करिता खुणे पावे जीव ।।५।।
आळंदीवल्लभ कृपावंत होता । उडतां नाचतां मुक्ति लाभे ।।६।।

चिंतन :-

सज्जन संतांनी ही परमार्थाची सुलभ वाट दाखविली आहे.

आपल्या हृदयातील प्रेमाने हरीचे भजन करावे.

प्रत्येकाला गुरूपासून विद्या घ्यावी लागल्यामुळे शिष्याचे ठिकाणी गर्व होताच तो भंग पावतो. पुढे असलेल्या श्रीगुरूच्या मागून शिष्याला परमार्थ प्राप्ति होत असते.

रामकृष्ण हरी या मंत्राला सिद्ध-अरि चक्र वगैरे शोधून मग मंत्र द्यावा याची मुळीच गरज नाही. सिद्धारि चक्र विरहित हा मंत्र खास भक्तीसाठी शोधून काढला आहे.

श्रीहरीच्या कथेच्या गुणानुवादात मग्न झाले की संसारतापाने जळले पोळलेले आर्त सर्व शांति पावतात.

सोहं चा जप करून योगसाधना किंवा डोळे दाबून साधना न करता, केवळ रामकृष्ण नामाच्या संकेताने जीव परमेश्वराची प्राप्ति करून घेतो.

भक्तिरंगात नाचता नाचता गाता गाता आळंदीवल्लभ कृपावंत होतात आणि मुक्ती लाभते.

२९१ / सर्व साधनमार्ग प्रमाण

देवासाठी चाळे । वैदिक किंवा निराळे ।।१।।
ते ते आघवे प्रमाण । जेवि गोपींचा मदन ।।२।।
सखा आळंदीवल्लभू । दास दयाळू स्वयंभू ।।३।।

चिंतन :-

वैदिक उपासना असो, इतर कोणतीही उपासना असो किंवा इतर कोणताही धर्म विरोधी उपाय देव मिळविण्यासाठी असला तर-

गोपींच्या कामदेव मदनाप्रमाणे प्रमाणभूत आहे, अयोग्य नाही.

अशा परमेश्वरासाठी होणाऱ्या प्रयत्नांना तो दासासाठी अतिशय दयाळू असलेला सखा आळंदीवल्लभ स्वतःहूनच त्यांचे प्रयत्न यशस्वी करतो.

२९२

तूं माझी माउली तूं माझी बहीण । तूं माझे निधान ज्ञानाबाई ।।१।।
तूंचि माझा वेद तूंचि माझी स्मृति । तूंचि माझी गति ज्ञानाबाई ।।२।।

तूं माझे पावन तूं माझे जीवन । तूं माझे संपूर्ण ज्ञानाबाई ।।३।।
आळंदीवल्लभे तुजवीण आन । नेणे येथ आण असो तुझी ।।४।।

चिंतन :-

तू माझी माउली, माझी बहिण आहेस,
माझे सर्व निधान तू आहेस.
तूच मला वेदरूपाने आणि स्मृतिरूपाने प्रमाणभूत आहेस,
शेवटी पूर्णत्वाला पोहोचण्याचे गंतव्यस्थान तूच आहेस.
मला पावन करणारी तूच आहेस.
तू माझे जीवनसर्वस्व आहेस.
माझे सर्वकाही तूच आहेस.
हे आळंदीवल्लभे, तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणालाही मी जाणत नाही,
हे मी शपथपूर्वक सांगते.

२९३

तूं माझी माउली तूं माझी बहीण । तूं माझे जीवन ज्ञानाबाई ।।१।।
आणिकांची स्तुति न करी वचनी । तुजवीण मनी आन नाही ।।२।।
गोविंद गोपाळ कृष्णनाम वाचे । आन ते न वाचे मंत्रतंत्र ।।३।।
नलगे कैवल्य दिधले आणिकी । तुझे गुण मुखी राहो नित्य ।।४।।
आळंदीवल्लभे सुखसांगातिणी । प्रेममय तिन्ही लोक करी ।।५।।

चिंतन :-

हे ज्ञानाबाई तूं माझी माउली आहेस, बहीण आहेस आणि जीवनही तूंच आहेस.
तुझ्याशिवाय आणिक कोणाची स्तुती माझ्या वाणीने मी कधीच केली नाही.
तुझ्याशिवाय माझ्या मनात कोणालाही स्थान नाही.
माझे वाणीवर गोविंद गोपाळ आणि कृष्णाचेच नाम आहे.
इतर मंत्र तंत्र वगैरे मी वाचीत सुद्धा नसते.
दुसऱ्याने मला मोक्ष दिला तरी तो मला नको.
तुझेच सद्गुणांचे वर्णन माझ्या मुखात नित्य राहो येवढेच वाटते.
हे आळंदीवल्लभे तूं सुखाची सांगातीण आहेस.
सर्व तिन्ही लोक प्रेममय करून टाक पाहू.

२९४

कोणते साधन नाही मियां केले । पाहिजे बोलिले यदुराया ।।१।।
आघवेचि नामे घडते तुझिया । मग मज काह्या आनापेक्षा ।।२।।
रुपाविणे नाम न पावेचि शोभा । नामाविणे शोभा रुप तेही ।।३।।
नामे विप्रलंभू रुपाने संयोग । श्रीआळंदीरंग दोन्ही ठायी ।।४।।

चिंतन :-

हे यदुराया, तुला मिळविण्यासाठी मी कोणते साधन केले नाही ते सांग पाहू.
एका नामसाधानेने सर्व लहानमोठी सर्व साधने आपोआपच घडतात. मग मी इतर साधनांच्य मागे कां लागू??

२९५ / माझे मंगळसूत्र

माझे हे मंगळसूत्र । श्रीमद्भागवत शास्त्र ।।१।।
तेचि आर्यपुत्रमूर्ति । ऐसी पुराणात कीर्ति ।।२।।
कंठी धरीन आवडी । शोभा हृदयाची फुडी ।।३।।
स्वामी आळंदीजीवन । आदिमध्यान्ती प्रमाण ।।४।।

चिंतन :-

श्रीमद्भागवतशास्त्र हे माझे मंगळसूत्र आहे.
हे भागवत म्हणजे साक्षात भगवान् श्रीकृष्ण होय, अशी पुराणात कीर्ति वर्णिली आहे.
म्हणून भागवत कंठी आवडीने ठेवीन आणि त्यामुळे हृदयाची शोभा म्हणजे कृष्णप्रेम अधिक शोभायमान होईल.
आदि मध्य आणि शेवटी सर्वत्र मला ज्ञानेश्वरांचे वचनच आज्ञा म्हणून प्रमाण आहे.

२९६ / सगुणाच्या ४ अभिव्यक्ती

निर्गुण सगुण दोन्हीही अकळ । एका ज्ञानबळ, ध्यान एका ।।१।।
ज्ञानमय साक्षी आपुले अंतरी । सगुण बाहेरी अभिव्यक्त ।।२।।
माय बाप गुरू वनितांचा पति । चार अभिव्यक्ति सगुणाच्या ।।३।।
चौघांच्या हृदयी साहजिक दया । नलगे उपाया करणे बहु ।।४।।
अल्पपुत्रश्रमे मायबापकृपा । उमटता सोपा तपोमार्गू ।।५।।
आणिक देवता सांग धाल्यावीण । स्नेहाभावी शीण उगा देती ।।६।।
अल्पश्रमसेवा प्रियेची पाहोनी । नुचंबळे मनी ऐसा कोण ।।७।।
सर्व ब्रह्म मग शिष्य कां श्रमावा । सदगुरूस्वभावा कृपा येणे ।।८।।
होईल तो धर्म साधे येणे माने । उल्हासे सन्माने पूजिलिया ।।९।।
ज्ञानेश्वर स्वामी नाही पक्षपाती । एका दुजे पंथी पाठवाया ।।१०।।

*चिंतन :-*

*निर्गुण आणि सगुण दोन्ही सहज कळणारे नाहीत.*

*निर्गुण ज्ञानाने कळतं आणि सगुण ध्यान करून मिळतं.*

*आपल्या आत ज्ञानमय आणि साक्षी स्वरूप असून बाहेर सगुण भगवंत अभिव्यक्त झालेला असतो.*

*माता-पिता-गुरू आणि गोपींचा पती या चार रूपाने तो बाहेर अभिव्यक्त झाला आहे.*

*या चौघांच्या हृदयात दया ही स्वाभाविकच राहते. त्यासाठी खूप उपाय करावे लागत नाहीत.*

*पुत्राने अल्प श्रम केले तरी आईवडिलांना त्याविषयी प्रेम दाटून येते.*

*आणि ते प्रेम मिळाल्यावर तपोमार्ग हाही सोपा होऊन जातो.*

*आणिक इतर देवता सांगोपांग तृप्त झाल्याशिवाय प्रेम नसल्याने उपासकाला कष्ट देत असतात.*

*आपल्या प्रियेची थोडीशी का होईना प्रेमाने केलेली सेवा पाहून कोणाला प्रेम दाटून येत नाही.*

*सर्वच ब्रह्म आहे तर शिष्यही ब्रह्मच असे म्हणून शिष्यालाही श्रम नकोत या भावनेने श्रीगुरू स्वाभाविकपणे कृपा करतात.*

*अशाप्रकारे होईल तो थोडासाही धर्म, श्रीगुरूंची उल्हासाने पूजा केली की प्राप्त होतो.*

*ज्ञानेश्वरस्वामी पक्षपाती नाहीत आपल्याकडे आलेल्याला दुसऱ्या भलत्या मार्गाकडे पाठवीत नाहीत.*

२९७ / सर्व पंथांची उपास्ये

** वैष्णवाचा विष्णु शैवाचा शंकर । माझा ज्ञानेश्वर दयाघनु ।।१।।*
*सौरांचा गभस्ति वाघ्यांचा खंडोबा । माझा तो ज्ञानोबा दयाघनु ।।२।।*
*रामानुजा राम वल्लभांचा शाम । माझा प्रियतम ज्ञानेश्वर ।।३।।*
*गुंड मानभावी आनंदाचा दत्त । माझा ज्ञाननाथ दयाघनु ।।४।।*
*ज्ञानेश्वरस्वामी माझा सर्वा ठायी । आता चित्ता नाही धाव पुढे ।।५।।*

*(* उत्सव उदगार. निरनिराळ्या पंथांच्या लोकांना उद्देशून लिहिले आहे.)*

*चिंतन :-*

*वैष्णवांचा देव विष्णू, शैवांचा शंकर. आणि माझा दया संपन्न ज्ञानेश्वर आहे.*

*सौर संप्रदायांचा सूर्य, वाघ्यामुरळ्यांचा खंडोबा अन् माझा दयासंपन्न ज्ञानेश्वर आहे.*

*रामानुजांचा राम, वल्लभांचा बाळ कृष्ण अन् माझा प्रियतम ज्ञानेश्वर आहे.*

महानुभावाचा गुंडाराऊळ म्हणजे चक्रधर, आनंद संप्रदायाचा दत्त असून माझे ज्ञाननाथ आहेत.

या सर्व उपास्य देवतांचे ठायी ज्ञानेश्वरमहाराजच विराजमान आहेत.

त्यामुळे त्यांचे शिवाय इतर ठिकाणी माझे चित्त धावत नाही.

२९८

विकार उठती अनेक म्हणून । ध्यान माझे मन करू नेच्छी ।।१।।
परी नामविण नाही गति काही । नामे लवलाही होय ध्यान ।।२।।
आता जैसे तैसे कुविकार खोटे । उठलिया नेटे मानिताहे ।।३।।
परी नामी ध्यानी दृढ सत्यभाव । गाते ज्ञानदेव धरूनिया ।।४।।

चिंतनः-

माझे मनात अनेक विकार उठत राहतात.

मन ध्यानाची इच्छाच होत नाही.

नामाने मात्र ध्यानात मन सहज रमते.

नामाशिवाय तुझी प्राप्तीच होऊ शकत नाही.

जे काही कुविकार मनात उठतात ते सारे, चुकीचे आणि खोटे असले तरी उत्तम वाटतात.

नामासह होणाऱ्या ध्यानात अज्ञानजन्य खोट्याला अवसर नाही.

तेथे अनुभूत होणारे सारे, सत्य म्हणजे सच्चिदानंदघन असते.

यात विकारादि सर्व वृत्ती सच्चिदानंरूपच असतात.

असे नामासह रूपाचे ध्यानात उठणारे प्रेमाचे उन्मेष अज्ञानाने भासणाऱ्या सृष्टिसंबंधी नसतात.

ते शुदद्ध सच्चिदानंदघन सत्य असतात.

म्हणून मी ज्ञानदेवांचे नामाच्याा नित्यपाठात निमग्न आहे.

०००० ०